cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१५६ | बुधवार दि.२६ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### बिहारमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन पेटले!

पाटणा : बिहारची राजधानी पाटणात विद्यार्थ्यांचे आंदोलन भडकले आहे. विद्यार्थ्यांनी मंगळवारी मुख्यमंत्र्यांच्या घराच्या दिशेने काढलेल्या मार्चने राजकीय वातावरण तापले. मार्चच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ७० वी इढरउ परीक्षा रद्द करावी, या मागणीसाठी मोठ्या संख्येने आंदोलक विद्यार्थी जमले होते. विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. विद्यार्थी आक्रमक झाल्याने बिहारमधील राजकीय वातावरण तापले आहे.विद्यार्थी आंदोलकांनी प्रशासनाकडे मुख्यमंत्र्यांच्या भेटीची मागणी केली आहे. त्याच शिक्षण विभागाचे मुख्य सचिव आणि शिक्षणमंत्र्यांशी चर्चा करण्याचीही मागणी केली आहे. पाटण्यातील गर्दनीबागमध्ये अनेक विद्यार्थी संघटना आंदोलनाला बसल्या आहेत. या आंदोलनाला जवळपास १३-१४ संघटनांचा पाठिंबा मिळाला आहे. मुख्यमंत्र्यांच्या घेराव घालण्याच्या मागणीला आरजेडीकडूनही पाठिंबा मिळाला आहे.

### न्यायालयाने तेजपालची याचिका फेटाळली

मुंबई : 'तेहलका'चे माजी संपादक तरुण तेजपाल याला बलात्कार प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने दोषी ठरवले आहे. या निर्णयाला आव्हान देणारी याचिका तरुण तेजपालने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली असून, आत्मसमर्पणातून सूट देण्याची मागणी केली आहे. पण, सर्वोच्च न्यायालयाने तरुण तेजपालची याचिका फेटाळली असून, दोन आठवड्यांत आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले आहेत.तेजपालला २०१३ मध्ये एका महिला पत्रकारावर बलात्कार केल्याबद्दल दोषी ठरवून १० वर्षांच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. शिक्षेला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यापूर्वी त्याला आत्मसमर्पण करावे लागणार होते.२०१३ मध्ये तरुण तेजपालने त्याच्या 'तेहलका' या मासिकात काम करणा-या सहकारी महिलेवर दोनवेळा बलात्कार केला होता. ७ आणि ८ नोव्हेंबर २०१३ ला ही घटना घडली होती. या प्रकरणात त्याला ३० नोव्हेंबर २०१३ ला अटक झाली.

### वैभवचा बॅटिंगनंतर बॉलिंगमध्येही जलवा

मुंबई : आपल्या तुफानी बॅटिंगने वैभव सूर्यवंशीने सर्वांना वेड लावले आहे. भारताकडून सर्वात कमी वयात पदार्पण करण्याचा सचिन तेंडुलकरचा विक्रम वैभवने मोडल होता. वैभवची बॅटिंग सर्वांनी पाहिलीच होती पण आता पठ्ठ्याने बॉलिंगमध्येही दमदार प्रदर्शन केले आहे. एकाच ओव्हरमध्ये दोन विकेट घेत वैभवने छाप सोडली. दुलीप ट्रॉफीमध्ये ईस्ट झोन आणि नॉर्थ ईस्ट झोनमध्ये सामना सुरू आहे. या सामन्यामध्ये वैभवच्या खेळीकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते पण त्याने मात्र निराशा केली. बॅटिंगमध्ये नाही पण पठ्ठ्याने बॉलिंगमध्ये कमाल करून दाखवली.ईस्ट झोनकडून वैभव सूर्यवंशी सलामीला खेळण्यासाठी उतरला होता. वैभवने या सामन्यात ६ चेंडूत ८ धावा केल्या. त्याने केलेल्या ८ धावा या दौन चौकारांनीच केल्या होत्या. वैभव मोठी खेळी करू शकला नाही, मात्र ईस्ट झोन संघाने ६७ धावांचा मोठा डाव उभारला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२५ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २९.५० क्विंटल | २,६११ | २,७८८ | २,६७४ |
| ज्वारी/हायब्रिड: १३२.०० क्विंटल | २,००१ | ३,३९१ | २,७४२ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,४०१ | ७,३९९ | ६,९०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १२.५० क्विंटल | २,६८१ | २,६८१ | २,६८१ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,९१० | ८,९१० | ८,९१० |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ५,८३० | ५,८३० | ५,८३० |

# साखरेच्या दरवाढीचा फायदा ऊस उत्पादकांना द्या!

## शेतकरी पाल्यांचे साखर आयुक्तालयावर आंदोलन

पुणे । प्रतिनिधी

**साखरेच्या वाढलेल्या बाजारभावाचा योग्य लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळावा, उसाला किमान सात हजार रुपये प्रतिटन भाव द्यावा, थकीत ऊस बिले तातडीने अदा करावीत, तसेच वजनकाटा आणि रिकव्हरीमधील गैरव्यवहाराला आळा घालावा, या विविध मागण्यांसाठी पुण्यातील शेतकरी पाल्य आणि विद्यार्थ्यांनी साखर आयुक्तालयावर आंदोलन केले. पुण्यात शिक्षण घेणारे तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या शेतकरी पुत्रांनी एकत्र येत साखर आयुक्तालयासमोर आंदोलन करून आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. आंदोलकांनी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.**

सध्या बाजारात साखरेचे दर लक्षणीयरीत्या वाढले असतानाही त्याचा अपेक्षित फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळत नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. एकीकडे शेतीसाठी लागणाऱ्या बियाणे, खते, औषधे, मजुरी, सिंचन आणि वाहतूक खर्चात सातत्याने वाढ होत आहे. दुसरीकडे ऊस उत्पादनाचा खर्च वाढत असताना कारखान्यांकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या दराबाबत पारदर्शकता नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत असल्याचे




आंदोलकांनी सांगितले. "सध्या बाजारात साखरेचे दर लक्षणीयरीत्या वाढले आहेत; मात्र या वाढलेल्या दराचा कोणताही ठोस फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होत नाही. वाढता उत्पादन खर्च आणि कारखान्यांची मनमानी यामुळे शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा त्यांना वेळेत मिळाला पाहिजे आणि त्यांच्या होणाऱ्या फसवणुकीला

▶▶ पान २ वर

### अनुदान आणि एकरकमी एफआरपी द्या...

मागील हंगामातील शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान तातडीने त्यांच्या खात्यावर जमा करावे, अशीही मागणी करण्यात आली. तसेच ऊस उत्पादकांना एफआरपीची रक्कम टप्प्याटप्प्याने न देता एकरकमी देण्यात यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन ऊस बिलाची संपूर्ण रक्कम वेळेत मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची गरज आहे. साखरेच्या वाढलेल्या दराचा लाभ साखर उद्योगातील इतर घटकांप्रमाणे ऊस उत्पादकांनाही मिळाला पाहिजे, अशी मागणी करण्यात आली.

# आता नव्या पिढीला संधी दिली पाहिजे-नितीन गडकरी

नागपूर । प्रतिनिधी

भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या राजकीय प्रवासातील जुन्या आठवणी सांगतानाच आरोग्य, जीवनशैली आणि नव्या पिढीला नेतृत्वाची संधी देण्याबाबत महत्त्वाचं विधान केलं आहे. 'आता मी जास्त काम करू शकत नाही. नवीन पिढीच्या हातात काम दिलं पाहिजे,' असं गडकरी यांनी म्हटलं आहे. तसेच, 'तब्येत चांगली असेल तरच आयुष्याचा आनंद घेता येतो. तब्येत बिघडली तर सत्ता, संपत्ती,



सौंदर्य आणि ज्ञानाचा काय उपयोग?' असा सवालही त्यांनी केला. काटोल तालुक्यातील पारडसिंगा येथे आयोजित एकलव्य एकल विद्यालय शिक्षक पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाच्या समारोप कार्यक्रमात नितीन गडकरी बोलत होते. यावेळी त्यांनी आपल्या जुन्या राजकीय कार्यकाळातील साधी जीवनशैली आणि सध्याच्या बदललेल्या दिनचर्येबाबत सांगितलं.

गडकरी म्हणाले की, "राजकारणात सुरुवातीच्या काळात आपलं आयुष्य अतिशय अनऑर्गनाइज्ड, अनडिसिप्लिन आणि अनियमित होतं. पक्षाचं काम करताना कुठे स्कूटरवर

▶▶ पान २ वर

# देवेंद्र फडणवीसांचं केंद्रात वजन वाढणार

मुंबई । प्रतिनिधी

दिल्लीच्या जंतरमंतर येथील विद्यार्थी आंदोलनामुळे गेल्या १२ वर्षात पहिल्यांदाच सत्तेला हादरा बसल्यानंतर आता याचाच एक भाग म्हणून लवकरच भाजप पक्षसंघटनेची सर्वोच्च समिती असणाऱ्या संसदीय मंडळात काही बदल केले जाऊ शकतात. यावेळी महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश भाजपच्या संसदी मंडळात होऊ शकतो. यापूर्वी नितीन गडकरी हे भाजपच्या संसदीय मंडळात होते. मात्र, ते संसदीय मंडळातून बाहेर झाल्यानंतर महाराष्ट्राचा एकही नेता याठिकाणी नव्हता. त्यामुळे आता भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांना संसदीय मंडळात संधी दिली जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी अलीकडेच भाजपची नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर केली होती. त्यानंतर आता भाजपच्या संसदीय मंडळात बदल अपेक्षित आहेत. नितीन नवीन यांच्याकडून लवकरच यासंदर्भात घोषणा केली जाऊ शकते. त्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांचे नाव आघाडीवर असल्याचे मानले जाते. तीन निवडणुकांत भाजपला १०० प्लस जागा निवडून देणारे देवेंद्र फडणवीस हे एकमेव मुख्यमंत्री आहेत. या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे केंद्रातील देवेंद्र फडणवीस यांचे वजन वाढले आहे. त्यामुळेच देवेंद्र फडणवीस यांना भाजपच्या संसदीय मंडळात स्थान मिळू शकते,

▶▶ पान २ वर



# गोड साखर कडू झाल्यानंतर नवीन नियम लागू

नवी दिल्ली । प्रतिनिधी

साखरेच्या वाढत्या किमती आणि कमी होत असलेल्या साठ्यावरून देशातील राजकारण चांगलेच तापले आहे. मात्र आता सण-उत्सवांच्या काळात साखरेचे वाढते दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने कच्च्या साखरेच्या आयातीबाबतच्या नियमांमध्ये सुधारणा करून कठोर पावले उचलली आहेत. सुधारित नियमांनुसार साखरेचा होणारा मोठा साठा रोखण्यासाठी आयात केलेली कच्ची साखर दोन महिन्यांच्या आत शुद्ध करून विकणे अनिवार्य करण्यात आले आहे.

साखरेच्या दरातील वाढीच्या पार्श्वभूमीवर सरकारने सोमवारी (२४ ऑगस्ट) आयातीच्या अटींमध्ये बदल केले आहेत. आता 'टॅरिफ रेट कोटा' अंतर्गत आयात केलेली कच्ची साखर पांढ-या किंवा शुद्ध साखरेमध्ये रूपांतरित करून दोन महिन्यांच्या आत

▶▶ पान २ वर

# सामाजिक न्यायाचा निधी वळवणे असंवेदनशील -सुप्रिया सुळे

मुंबई । प्रतिनिधी

सामाजिक न्याय विभागाचा हक्काचा निधी इतर योजनांकडे वळवून सरकार शोषित, वंचित आणि गरीब घटकांवर अन्याय करत असल्याचा घणाघाती आरोप



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

सामाजिक न्याय विभागासाठी अर्थसंकल्पात मंजूर केलेला निधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी वापरला जात असल्याबद्दल सुळे यांनी संताप व्यक्त केला. जो शोषित, वंचित आणि दुर्बल घटक आहे, त्याच्या कल्याणासाठी असलेला पैसा काढून घेणे अत्यंत असंवेदनशील

▶▶ पान २ वर

### विलीनीकरणाच्या चर्चा फेटाळल्या

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेबाबत विचारले असता त्यांनी या चर्चा पूर्णपणे फेटाळून लावल्या. आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि आमचा कोअर ग्रुप नियमितपणे पक्षीय आढावा बैठका घेत असतो. २९ तारखेला होणारी बैठक ही नियमित संघटनात्मक बैठक असून विलीनीकरणाचा कोणताही प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# मराठीची सक्ती परप्रांतीय रिक्षावाला परतीच्या वाटेवर

मुंबई । प्रतिनिधी

सोशल मीडियात सध्या मराठी हा हॅशटॅग ट्रेंडिंगमध्ये आहे, त्याचं कारण म्हणजे परिवहन मंत्र्यांनी राज्यातील रिक्षाचालकांना मराठीत संवाद साधनं बंधकारक केलं आहे. विशेषत: मुंबईत जे परप्रांतीय रिक्षाचालक आहेत, त्यांच्यासाठी सरकारनं मराठीचे धडे द्यायलाही सुरुवात केली आहे. जिथं आपण



पोटापाण्यासाठी काम करतो तिथली स्थानिक भाषा यायला हवी, तसेच मराठी अर्थात आपल्या मातृभाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी हे पाऊल उचलण्यात

▶▶ पान २ वर

# राहुल गांधींचं फडणवीसांना पत्र अन आदिवासी मंत्री-आमदारांची तातडीची बैठक

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारने शासकीय आदिवासी वसतिगृहांबाबत घेतलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी विद्यार्थ्यांचं मागील १३ दिवसांपासून पुण्यातील मांजरी फार्म इथं उपोषण सुरू आहे. यातील एका विद्यार्थिनीने काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत पुण्यात झालेल्या



कार्यक्रमात आपली भूमिका मांडल्यानंतर नुकतंच राहुल गांधी यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीत या विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधले. त्यानंतर आज राज्यातील आदिवासी समाजातील आमदार-खासदारांची मुंबई येथे महत्त्वाची बैठक पार पडली.

बैठकीनंतर माहिती देताना मंत्री अशोक उईके यांनी सांगितलं की, "१४ ऑगस्ट २०२६ शासन निर्णयाद्वारे शासकीय आदिवासी वसतिगृहात प्रवेशासाठी ३० वर्षांची वयोमर्यादा ठेवण्यात आली होती. मात्र ही अट आपण आता रद्द करत असून

▶▶ पान २ वर

# मंत्रालयातील सर्व प्रतिनियुक्त्या रद्द करण्याची नामुष्की



मुंबई । प्रतिनिधी

**विविध माध्यमांनी मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अवैध नियुक्त्यांवर प्रकाश टाकल्यानंतर अखेर राज्य सरकार खडबडून जागे झाले आहे. सामान्य प्रशासन विभागाने एक अत्यंत महत्त्वाचा शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयामुळे मंत्रालयात तसेच विविध मंत्र्यांच्या कार्यालयांमध्ये विहित प्रक्रिया न पाळता वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेल्या अधिकाऱ्यांना अखेर गाशा गुंडाळावा लागणार असून, त्यांना त्यांच्या मूळ विभागात परत जावे लागणार आहे.**

मंत्रालय आणि मंत्र्यांच्या आस्थापनेवर नियमांची पायमल्ली करून करण्यात आलेल्या उसनवारी, प्रतिनियुक्ती तसेच केवळ मौखिक आदेशावर कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या तात्काळ रद्द करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. सामान्य प्रशासन विभागाने हे परिपत्रक जारी करताना मंत्रालयातील मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत अत्यंत कडक भूमिका घेतली आहे. नियुक्ती रद्द करण्यात आलेल्या सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ कार्यालयात परत पाठवण्याची संपूर्ण

▶▶ पान २ वर

# बेरोजगारी! देशातील ८.७ कोटी तरुण रिकामटेकडे

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**देशातील तब्बल ८.७ कोटींहून अधिक तरुणांबाबत नीती आयोगाचा एक धक्कादायक अहवाल आहे. या तरुणांना रोजगार, शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण मिळालेले नाही. १५ ते २९ वयोगटातील अंदाजे ८.७ कोटी भारतीय तरुण या श्रेणीत येतात. नीती आयोगाच्या एका अहवालानुसार, १५ ते २९ वयोगटातील ११ टक्के तरुण ना शिक्षण घेत आहेत, ना नोकरी करत आहेत. तर, पदवीधरांपैकी फक्त ८.२५ टक्के तरुणांनाच पात्रतेशी सुसंगत नोकरी मिळाली आहे. १५ ते २९ वयोगटातील ८८ टक्के तरुण घरगुती कामात गुंतलेले आहेत.**

अहवालात राज्याच्या महास्वयम योजनेचे कौतुक करण्यात आले आहे. नीती आयोगाच्या ताज्या हवालानुसार, २०१४-१५ पासून आतापर्यंत देशात ७.६७ कोटींहून अधिक व्यक्तींना प्रशिक्षण देण्यात आले. ही गती कायम राखण्यासाठी केंद्र सरकारने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात विविध मंत्रालयांच्या माध्यमातून कौशल्य विकासाशी संबंधित खर्चासाठी ३४ हजार कोटींची तरतूद केली. महाराष्ट्राच्या महास्वयम यांसारख्या राज्यस्तरीय



योजनांनीही या प्रयत्नांमध्ये पूरक भूमिका बजावली आहे.महिलांच्या बाबतीत हा अहवाल अत्यंत काळजी वाढवणारा आहे. देशात फक्त ३ टक्के महिला औपचारिक नोक-यांमध्ये कार्यरत आहेत. सुमारे ७१ टक्के महिला एक तर अनौपचारिक कामांमध्ये आहेत किंवा शिक्षण आणि रोजगारापासून पूर्णपणे दूर आहेत. घरगुती जबाबदा-या, सुरक्षितता आणि प्रवासाच्या अडचणींमुळे महिलांना घराबाहेर पडून प्रशिक्षण घेणे कठीण होते. त्यामुळे ६८ टक्के महिला अर्धवेळ अभ्यासक्रमांना प्राधान्य देतात.तरुण नवीन गोष्टी किंवा कौशल्ये का शिकू शकत नाहीत, याची काही कारणे अहवालात दिली आहेत. त्यापैकी प्रमुख कारण म्हणजे कुटुंबाची गरिबी आणि आधीच्या शिक्षणावर झालेला मोठा खर्च. तसेच, प्रशिक्षण घेताना चालू असलेले काम सोडावे लागल्यास घर चालवणे अवघड होते. तर, पूर्णवेळ किंवा

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# कोळपलेली फुलं आणि व्यवस्थेचा बधीरपणा!

अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता कक्षात सोमवारी पहाटे लागलेल्या आगीत तीन नवजात अर्भकांचा मृत्यू झाला. सुमारे ३९ नवजात बालके उपचाराधीन असताना ही दुर्घटना घडली आणि प्राथमिक माहितीनुसार कृत्रिम श्वसन यंत्रात स्फोट झाल्यानंतर आग भडकली. नेमके कारण तपासानंतरच स्पष्ट होईल; मात्र या दुर्घटनेने एक प्रश्न निर्विवादपणे उभा केला आहे. सरकारी रुग्णालयांच्या सुरक्षेचे परीक्षण कागदावर होते की प्रत्यक्षात?

ही केवळ एका कृत्रिम श्वसन यंत्राची किंवा एका विद्युत लघुपरिपथाची कथा नाही. ही त्या व्यवस्थेची कथा आहे, जी प्रत्येक दुर्घटनेनंतर चौकशी समिती नेमते, अहवाल मागवते, काही अधिकाऱ्यांना निलंबित करते, आर्थिक मदत जाहीर करते आणि काही दिवसांनी पुन्हा जुन्याच मार्गावर चालू लागते. अमरावतीच्या या दुर्घटनेनंतर समोर आलेल्या वृत्तांनुसार अग्निसूचक आणि पाण्याची फवारणी करणारी यंत्रणा कार्यरत नसल्याचे आरोप आहेत. नवजात शिशू अतिदक्षता कक्ष तिसऱ्या मजल्यावर असल्यानेही प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामुळे 'अग्निसुरक्षा परीक्षण झाले होते' एवढे सांगून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. परीक्षणात दोष दाखवले होते का? दाखवले असतील तर ते दूर का केले नाहीत? आणि दोष दूर केल्याचे प्रमाणपत्र देणाऱ्या यंत्रणेची जबाबदारी कोणाची? ९ जानेवारी २०२१. भंडारा जिल्हा रुग्णालयाच्या नवजात शिशू अतिदक्षता कक्षात आग लागली आणि दहा नवजात बालकांचा मृत्यू झाला. चौकशीमध्ये तेजस्वी उष्णता देणाऱ्या बालक उबवणी यंत्राच्या इलेक्ट्रॉनिक नियंत्रण फलकातील दोषपूर्ण विद्युत परिपथ हा संभाव्य कारणांपैकी प्रमुख कारण म्हणून नोंदवण्यात आला. त्यानंतर सरकारने सर्व नवजात शिशू अतिदक्षता कक्षांमध्ये अग्निसुरक्षा परीक्षण, विद्युत परीक्षण आणि वैद्यकीय उपकरणांच्या कार्यप्रणाली व देखभालीचे परीक्षण करण्याचे निर्देश दिले. अग्निसुरक्षा ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आणि वर्षातून किमान एकदा अग्निसुरक्षा सराव घेणेही बंधनकारक करण्याचे सांगण्यात आले. पण भंडारा दुर्घटनेपूर्वीच परिस्थिती किती भयावह होती, हे चौकशीने दाखवून दिले होते. रुग्णालयात अग्निसुरक्षा ना-हरकत प्रमाणपत्र नव्हते, नवजात शिशू अतिदक्षता कक्षाची स्थापना झाल्यापासून केवळ एकच प्रत्यक्ष सराव झाल्याची माहिती समोर आली होती आणि अग्निसुरक्षा यंत्रणेसाठीचा सुमारे दीड कोटी रुपयांचा प्रस्ताव महिनोन्?महिने प्रलंबित होता. चौकशी समितीने प्रशिक्षित विद्युत आणि जैववैद्यकीय अभियंता नेमण्याची शिफारस केली. रुग्णालयांच्या देखभालीसाठी स्वतंत्र तांत्रिक मनुष्यबळ, नियमित प्रत्यक्ष सराव, निगराणी कॅमेरे, नवीन रुग्णालयांसाठी स्पष्ट प्रमाणित कार्यपद्धती आणि अग्निसुरक्षा यंत्रणा बळकट करण्याच्या सूचना करण्यात आल्या. म्हणजेच सरकारला समस्या माहिती होती. उपायही माहिती होते. प्रश्न फक्त अंमलबजावणीचा होता. आणि अमरावतीने पुन्हा तोच प्रश्न सरकारसमोर आणून ठेवला आहे. २०२२ मध्ये राज्यातील ५२७ सरकारी रुग्णालयांचे अग्निसुरक्षा परीक्षण पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला होता. त्यातील त्रुटी सहा महिन्यांत दूर करण्याचेही सांगण्यात आले. मग अमरावतीत सुरक्षा यंत्रणा काम करत नसेल, तर या परीक्षणाचे काय झाले? यापुढे 'परीक्षण झाले' हा शब्द पुरेसा नाही. प्रत्येक परीक्षण अहवाल सार्वजनिक झाला पाहिजे. कोणती त्रुटी आढळली, ती दूर करण्यासाठी किती निधी मंजूर झाला, काम कोणत्या संस्थेला दिले, काम पूर्ण झाल्याची तारीख कोणती आणि त्याची पुन्हा स्वतंत्र तपासणी कोणी केली हा संपूर्ण तपशील जनतेसमोर आला पाहिजे. अग्निसुरक्षा परीक्षण करणारी संस्था आणि दुरुस्तीचे काम करणारी संस्था एकच असता कामा नये. राज्यातील प्रत्येक सरकारी रुग्णालयासाठी स्वतंत्र तृतीय-पक्ष यंत्रणेकडून अग्निसुरक्षा आणि विद्युत परीक्षण सक्तीचे केले पाहिजे. त्यासोबत जैववैद्यकीय उपकरणांचे स्वतंत्र परीक्षणही झाले पाहिजे. विशेषतः नवजात शिशू अतिदक्षता कक्ष, नवजात अतिदक्षता कक्ष, अतिदक्षता कक्ष, शस्त्रक्रिया कक्ष आणि प्राणवायू सुविधा असलेल्या विभागांना 'उच्च-जोखीम क्षेत्र' घोषित करून त्यांची तपासणी सहामाही करणे आवश्यक आहे. भंडारा चौकशीत जैववैद्यकीय उपकरणांच्या देखभालीतील त्रुटींचाही मुद्दा पुढे आला. संबंधित सेवा संस्थेच्या तंत्रज्ञांना विशिष्ट यंत्राचे पुरेसे प्रशिक्षण नसल्याचेही नोंदले गेले होते. मग सरकारी रुग्णालयात जीव वाचवणाऱ्या उपकरणांची देखभाल कोण करतो, त्याची पात्रता काय आहे, त्याने शेवटची तपासणी कधी केली आणि उपकरण धोकादायक स्थितीत असल्यास ते वापरातून काढण्याचा अधिकार कोणाला आहे. याची संगणकीकृत नोंद असली पाहिजे. कंत्राटदाराने निष्काळजीपणा केला आणि त्यातून मृत्यू झाला, तर केवळ कंत्राट रद्द करणे किंवा कंपनीला काळ्या यादीत टाकणे पुरेसे नाही. तपासात गुन्हेगारी निष्काळजीपणा सिद्ध झाल्यास भारतीय न्यायसंहितेतील लागू तरतुदींनुसार फौजदारी कारवाई झाली पाहिजे. कंपनीसोबत संबंधित जबाबदार अधिकारी, पर्यवेक्षक आणि प्रमाणपत्र देणाऱ्या व्यक्तीची वैयक्तिक जबाबदारीही निश्चित झाली पाहिजे. सरकारी कंत्राट म्हणजे 'नफा खाजगी, नुकसान सार्वजनिक' असा परवाना नाही. अमरावतीच्या घटनेत चौकशी होईल. दोषी शोधले जातील. काही अधिकाऱ्यांवर कारवाई होईल. कदाचित आर्थिक मदतही जाहीर होईल. पण खरा प्रश्न त्यानंतरचा आहे. सरकारने आता राज्यातील प्रत्येक सरकारी रुग्णालयाचा 'सुरक्षा दर्शकफलक' तयार करावा. अग्निसुरक्षा ना-हरकत प्रमाणपत्र, विद्युत परीक्षण, जैववैद्यकीय परीक्षण, पाण्याची फवारणी करणारी यंत्रणा, अग्निसूचक, प्राणवायू सुरक्षा, आपत्कालीन बाहेर पडण्याचा मार्ग, प्रत्यक्ष सराव आणि दुरुस्तीची स्थिती यांचा सार्वजनिक हिशेब उपलब्ध करून द्यावा. कागदावरील नियम न राहता प्रत्यक्ष सराव झाला पाहिजे. विशेषतः नवजात बालकांना वाचवण्यासाठी स्वतंत्र 'बालक स्थलांतर कार्यपद्धती' असली पाहिजे. कारण प्रौढ रुग्णाला उचलून बाहेर नेता येते; पण अतिदक्षता विभागातील काही दिवसांचे अर्भक यंत्रणेशिवाय हलवणे ही स्वतःमध्ये वैद्यकीय आणीबाणी असते. अमरावतीत आणखी तीन निष्पाप कळ्या व्यवस्थेच्या निष्काळजीपणाने गमावल्या गेल्या. भंडाऱ्यानंतर सरकारकडे सूचना होत्या, अहवाल होता, शिफारसी होत्या आणि उपाययोजनांची यादीही होती. तरीही आज पुन्हा तोच प्रश्न उभा आहे. उत्तर सरकारने द्यायचे आहे. आणि यावेळी उत्तर चौकशी समितीच्या अहवालात नव्हे, तर राज्यातील प्रत्येक सरकारी रुग्णालयाच्या प्रत्यक्ष सुरक्षेत दिसले पाहिजे. कारण नवजात बाळांचे जीव हे कोणत्याही फाईलवरील 'प्रलंबित प्रस्ताव' नाहीत. ते या राज्याच्या भवितव्याची पहिली धडधड आहेत. त्या धडधडीला पुन्हा आगीच्या ज्वाळांमध्ये हरवू द्यायचे नसेल, तर आता परीक्षण नव्हे अंमलबजावणी, आश्वासन नव्हे उत्तरदायित्व आणि निलंबन नव्हे कायदेशीर जबाबदारी आवश्यक आहे.



बीडः श्री. संत बाळूमामा देवस्थान भानकवाडी ता. शिरुर (कासार) जि. बीड येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी भेट देऊन आशीर्वाद घेतले. यावेळी ह. भ. प. एकनाथ महाराज गाडे, ह. भ. प. हनुमान महाराज कैतके, बापूसाहेब येळे, सरपंच साईनाथ कैतके, राहुल उत्तमराव सोनसळे, खंडू भानुदास सोनसळे, मोहन रानमारे, बाळू सोनसळे, राजेंद्र रणमारे, भाऊसाहेब रानमारे, सखाराम गोरे, उत्तमराव सोनसळे, राम कोकाटे, युवराज जाधव, नवनाथ भडके, पवन शेटे सह परिसरातील असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

# ग्रामसभा अर्धवट सोडून सरपंच-ग्रामसेवक निघून गेले

## ग्रामसभा नियमानुसार पूर्ण घेण्यासह चौकशी व दोषींवर कारवाईची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

**ग्रामसभा सुरू असताना सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामसभा पूर्ण न करता सभास्थळ सोडून गेल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या घटनेची चौकशी करून ग्रामसभा नियमानुसार पूर्ण घेण्यात यावी, तसेच दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्याने गेल्या ८ दिवसापासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर शांततामय व लोकशाही मार्गाने ग्रामस्थ उपोषणाला बसले आहेत. दरम्यान या उपोषण आंदोलनाला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, आमदार संदीप क्षीरसागर, युवा नेते यशराज पंडित यांनी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना ग्रामस्थांच्या मागण्या सोडवण्याच्या सूचना केल्या आहेत.**

याबाबत ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांना दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी लेखी पूर्वसूचना देण्यात आली आहे. निवेदनानुसार, आयोजित ग्रामसभा सुरू असताना सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामसभा पूर्ण न करता सभास्थळावरून निघून गेल्याची घटना घडली. त्यामुळे ग्रामसभेत उपस्थित नागरिकांना आपले प्रश्न, तक्रारी व सूचना मांडण्याची संधी मिळाली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामसभेच्या कामकाजाबाबत नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, संबंधित प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन ग्रामसभा नियमांनुसार पूर्ण का करण्यात आली नाही, याची योग्य ती चौकशी करावी, अशी मागणी व्यंकट घोडके, विष्णू घोडके, लक्ष्मण घोडके, मोहन घोडके, सचिन घोडके, तुकाराम घोडके, जगदीश शिंदे आदी ग्रामस्थांनी निवेदनात केली आली आहे. तसेच ग्रामसभेचे कामकाज पारदर्शक आणि नियमानुसार घेण्यात यावे, ग्रामसभेतील नागरिकांचे प्रश्न व निवेदने अधिकृत नोंदवहीत नोंदविण्यात यावीत आणि ग्रामसभेच्या कामकाजाची अधिकृत नोंद/इतिवृत्त नियमानुसार तयार करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या मागण्यांबाबत तातडीने योग्य ती कार्यवाही न झाल्याने दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ वाजेपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर व्यंकट घोडके, विष्णू घोडके, लक्ष्मण घोडके, मोहन घोडके, सचिन घोडके, तुकाराम घोडके, जगदीश शिंदे आदींनी शांततामय व लोकशाही मार्गाने उपोषण सुरू करण्यात आले आहे. उपोषणादरम्यान बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांनी उपोषणकर्त्यांच्या दोन वेळा भेटी घेतल्या मात्र आंदोलनकर्त्यांचे समाधान न झाल्याने आंदोलन सुरू आहे. ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या १) ग्रामसभा सोडून निघून जाण्याच्या घटनेची चौकशी करावी. २) ग्रामसभा नियमानुसार पूर्ण करून नागरिकांचे प्रश्न व निवेदने नोंदवावीत. ३) ग्रामसभेच्या कामकाजाची अधिकृत नोंद/इतिवृत्त नियमानुसार करावे. ४) दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार प्रशासकीय कारवाई करावी. ५) ग्रामसभा कायदेशीर व पारदर्शक पद्धतीने घेण्यात यावी.६) संबंधित प्रकरणात दखल घेऊन योग्य निर्णय घ्यावा. ग्रामस्थांच्या या मागण्यांवर प्रशासन काय भूमिका घेते आणि संबंधित ग्रामपंचायत स्तरावर पुढील कार्यवाही काय होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# नारळी पौर्णिमेनिमित्त श्री दत्त संस्थान बालाघाट येथे भव्य उत्सव सोहळा

## २७ ऑगस्ट रोजी विविध धार्मिक कार्यक्रम; महाप्रसादाचेही आयोजन

मांजरसुंबा, प्रतिनिधी

**श्री दत्त संस्थान बालाघाट, कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे नारळी पौर्णिमेनिमित्त गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी भव्य धार्मिक उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प.पू. ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.**

नारळी पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त श्री दत्त संस्थानच्या वतीने भाविक भक्तांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी श्री दत्तांचे दर्शन, पूजा-अर्चा व धार्मिक विधींमध्ये सहभागी होण्यासाठी पंचक्रोशीतील तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. श्रद्धा आणि भक्तीभावाने श्री दत्तांचे दर्शन घेऊन पूजा-अर्चा करण्यासाठी भाविकांना विशेष संधी उपलब्ध होणार आहे. उत्सवासाठी येणाऱ्या भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये, यासाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. अन्नदानाच्या या सेवेसाठी ब्रह्मदेव आश्रुबा शिंदे (कोळवाडी), आश्रुबा केरबा शिंदे (कोळवाडी) आणि लक्ष्मण मारुती जाधव (कपिलधारवाडी) यांनी पुढाकार घेतला आहे. उत्सवातील धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतल्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



श्री दत्त संस्थान बालाघाट हे परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने नारळी पौर्णिमेच्या उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून, विविध भागांतून भाविक दर्शनासाठी येणार आहेत. उत्सवाच्या निमित्ताने भाविकांनी शिस्त व शांतता राखून धार्मिक कार्यक्रमात सहभागी व्हावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. नारळी पौर्णिमेचा हा धार्मिक सोहळा सर्व भाविकांसाठी खुला असून, पंचक्रोशीतील नागरिकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री दत्तांचे दर्शन, पूजा-अर्चा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दत्त संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. या उत्सवाचे नियोजन श्री दत्त संस्थान, बालाघाट यांच्या वतीने करण्यात आले असून, अमोल शिंदे, गणेश शिंदे व समस्त दत्त भक्त परिवार उत्सवाच्या तयारीसाठी परिश्रम घेत आहेत. ''श्री गुरुदेव दत्त'' आणि ''अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त'' या जयघोषाने नारळी पौर्णिमेचा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्याची तयारी सुरू आहे.

# घरकुल सर्वेक्षणामध्ये सावळा गोंधळ!

## पात्र लाभार्थी वंचित ठेवल्याप्रकरणी ग्रामसभा घेऊन फेरसर्वेक्षणाची मागणी

घनसावंगी । प्रतिनिधी

**प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घनसावंगी तालुक्यात करण्यात आलेल्या घरकुल सर्वेक्षणात मोठा सावळा गोंधळ झाल्याचे उघड झाले असून जिरडगाव येथील अनेक खरे गरजू लाभार्थी घरकुलापासून वंचित राहिले आहेत.**

या अन्यायाविरोधात जिरडगाव येथील वर्षा शिंदे, शामसुंदर शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, सर्वेक्षणात प्रत्यक्ष स्थळ पाहणन करता मनमानी पद्धतीने याद्या तयार करण्यात आल्या. ज्यांच्याकडे पक्की घरे आहेत त्यांची नावे पात्र यादीत आहेत, तर कुडाच्या व झोपडीत राहणाऱ्या गरजूंची नावे वगळण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रशासनाकडे ठाम मागणी केली आहे की, ''तात्काळ ग्रामसभा बोलावून राहिलेल्या सर्व वंचित पात्र लाभार्थ्यांची नावे ग्रामसभेमध्ये घेऊन संपूर्ण यादीचे फेरसर्वेक्षण करावे. जर प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही तर संबंधित विभागाकडे रीतसर लेखी तक्रारी दाखल करून वरिष्ठ स्तरावर तक्रार करून कारवाई करण्यात येईल.

## पान १ वरून...

### साखरेच्या दरवाढीचा फायदा

आळा बसला पाहिजे,'' अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाचा विचार करून योग्य दर मिळणे आवश्यक असल्याचे सांगत आंदोलकांनी उसाला किमान सात हजार रुपये प्रतिटन भाव देण्याची मागणी केली. साखरेचे बाजारभाव, उपपदार्थांमधून मिळणारे उत्पन्न आणि कारखान्यांची आर्थिक स्थिती यांचा विचार करून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळावा, अशी मागणी करण्यात आली. अनेक कारखान्यांकडून ऊस उत्पादकांची बिले थकीत ठेवली जात असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. ऊस पुरवठा केल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळण्यासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत असल्याने शेतकऱ्यांवर कर्जाचा भार वाढत आहे. त्यामुळे थकीत ऊस बिले तातडीने अदा करावीत आणि जाणीवपूर्वक बिले थकविणाऱ्या कारखान्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. ऊस तोडणी आणि वाहतुकीपासून कारखान्यातील वजनापर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पादनाची योग्य नोंद होणे आवश्यक आहे. मात्र वजनकाटा तसेच साखर उताऱ्याच्या (रिकव्हरी) नोंदीमध्ये घोळ केला जात असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून वारंवार करण्यात येतात. त्यामुळे वजनकाट्यांची नियमित तपासणी करावी, इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांच्या नोंदी पारदर्शक कराव्यात आणि रिकव्हरीमध्ये गैरव्यवहार आढळल्यास संबंधित कारखान्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशाबाबत कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा गैरव्यवहार सहन केला जाणार नाही, अशी भूमिका आंदोलकांनी व्यक्त केली. या आंदोलनात वैभव मानवतकर, अनिकेत देशमाने, ओमकार ठोंबे, सचिन पांडुळे, हर्षवर्धन रेपे, उदय नागवडे, किरण बिरादार, अनिरुद्ध नागवे यांच्यासह पुण्यात शिक्षण घेणारे व विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले शेतकरी पुत्र आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

----------

### देवेंद्र फडणवीसांचं केंद्रात

अशी चर्चा आहे. फडणवीसांच्या या नियुक्तीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचाही पाठिंबा असल्याचे समजते.गेल्या अनेक दिवसांपासून देवेंद्र फडणवीस दिल्लीला केंद्र सरकारमध्ये जाण्याची जोरदार चर्चा सुरु आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देवेंद्र फडणवीस हे नवे शिक्षणमंत्री होतील, असेही सांगितले जात होते. मात्र, देवेंद्र फडणवीस हे वारंवार आपण महाराष्ट्रातच राहणार असल्याचे सांगत आहेत. तरीही फडणवीसांच्या दिल्लीला जाण्याच्या चर्चा थांबलेल्या नाहीत. अलीकडच्या काळात देवेंद्र फडणवीसांच्या दिल्लीच्या वाऱ्याही वाढल्या आहेत. संसदीय मंडळ ही भाजपची सर्वोच्च आणि सर्वशक्तिशाली समिती आहे. भाजपच्या निर्णयप्रक्रियेत संसदीय मंडळाचा प्रमुख वाटा आहे.भाजपच्या या संसदीय मंडळात पंतप्रधान मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह यांच्यासह एकूण १२ जणांचा समावेश आहे. गेल्या काही काळात एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्याला संसदीय मंडळात नियुक्त करण्याचा प्रघात भाजपमध्ये पडला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून यावेळी देवेंद्र फडणवीस यांना संधी मिळू शकते, अशी चर्चा आहे. देवेंद्र फडणवीस हे संसदीय मंडळात गेल्यास त्यांचे स्वत:चे आणि महाराष्ट्राचे केंद्रातील वजन वाढेल. देवेंद्र फडणवीस हे भविष्यात केंद्राच्या राजकारणात जातील, अशी चर्चा महाराष्ट्रात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये कायम असते. त्याचीच ही पहिली पायरी असावी का, याबद्दल सध्या राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवले जात आहेत.

----------

### आता नव्या पिढीला संधी

तर कुठे गाडीने जायचो. त्या काळात पक्षाकडे आजच्यासारखी साधनसंपत्ती नव्हती. त्यावेळी पक्षाच्या एका पदाधिकाऱ्याकडे जुनी ॲम्बेसेडर कार होती. नेते विमानाने किंवा रेल्वेने आले तर त्यांना आणण्यासाठी गाडीची सोय व्हावी म्हणून त्यांना अध्यक्ष करा असा आमचा काळ होता,'' अशी आठवण नितीन गडकरी यांनी सांगितली.'माझ्याकडे आधी लुना होती, नंतर स्कूटर आली. विद्यार्थीसेनेत असताना आम्ही एकाच स्कूटरवर चौघेजण बसायचो. चौथा व्यक्ती नंबर प्लेटवर हात ठेवायचा, म्हणजे पोलिसांना नंबर दिसणार नाही,' असा काळ होता, कारण मजबुरीही होती. असं सांगत गडकरी यांनी त्या काळातील परिस्थितीवर मिश्कील भाष्य केलं. त्यावेळी जीवनशैली अनऑर्गनाइज्ड, अनडिसिप्लिन होतं, शिस्त नव्हती, असंही त्यांनी मान्य केलं. पक्षाचं काम करताना समोसा खायचो आणि झोपून जायचो, असं सांगत त्यांनी जुन्या दिवसांची आठवण सांगितली.

------------

### मराठीची सक्ती परप्रांतीय

आले आहे. पण याला काही परप्रांतीयांनी विरोध दर्शवला आहे. त्यातून एकाने परत आपल्या मूळ राज्यात परत जाण्याचा निर्णय घेताना सोबत ट्रेनमधून रिक्षा घेऊन जात असतानाचा एक व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. त्यामुळे मराठी सक्तीचा यांनी चांगलाच धसका घेतल्याचे चित्र आहे. सोशल मीडियात जो व्हीडीओ व्हायरल होत आहे तो एका रेल्वे प्लॅटफॉर्मवरचा व्हीडीओ आहे. प्लॅटफॉर्मवर रेल्वेगाडी थांबलेली असून या गाडीच्या लगेजच्या अर्थात पार्सलच्या डब्यात जिथून दुचाकी वाहने, तीनचाकी वाहनांची इतर राज्यांमध्ये सुरक्षितरीत्या वाहतूक केली जाते. या डब्यात एक रिक्षाचालक इतर काही लोकांच्या मदतीने आपली रिक्षा कोंबताना दिसत आहे. पण हा व्हीडीओ मराठीच्या सक्तीमुळे परत निघालेल्या रिक्षाचालकाचा आहे की नाही? याबाबत अद्याप पुष्टी होऊ शकलेली नाही. पण मराठी हॅशटॅगसह हा व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर शेअर झाला आहे.मराठी शिका नाहीतर रिक्षाचा परवाना रद्द.. या सरकारच्या निर्णयाचे स्वागत करत आहेत. तसेच या परप्रांतीय लोकांसाठी राज्य सरकारने मराठी शिकायला मोफत क्लास आणि वेळही दिला आहे. तरीपण हे लोक निघून जाऊ पण मराठी शिकणार नाही यावर अडून राहिले आहेत. पण आपण मराठी माणसं उगाचच त्यांच्या कम्फर्टसाठी त्यांच्याशी हिंदीत बोलतो. आपल्याला पण आपल्या भाषेचा अभिमान असला पाहिजे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केल्या आहेत.

-----------

### सामाजिक न्यायाचा निधी वळवणे

आहे. निवडणुका आल्या की अशा योजना जाहीर करायच्या आणि निवडणुका संपल्या की बजेटअभावी महिलांना वगळायचे, हा निव्वळ फसवणुकीचा प्रकार आहे, असा आरोप त्यांनी केला.पहिल्या टप्प्यात सुमारे ८० लाख महिलांना केवायसीच्या नावाखाली अपात्र ठरवले जात असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. देशात प्रत्येक वाडी-वस्तीवर जनधन बँक खाती आणि आधार कार्ड पोहोचू शकते, मग लाडक्या बहिणींचे केवायसी का होऊ शकत नाही? हे प्रशासनाचे अपयश असून जाणीवपूर्वक महिलांची संख्या कमी करण्याचा हा डाव आहे, असे सुळे म्हणाल्या.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या विधानाचा दाखला देत त्या म्हणाल्या, कुंभमेळा आणि मोठ्या महामार्गांवर हजारो कोटींची उधळपट्टी केली जात आहे, तर दुसरीकडे मराठी शाळा, आश्रमशाळा आणि रुग्णालयांची दुरवस्था झाली आहे. अमरावती रुग्णालयातील नवजात बालकांचा मृत्यू आणि पुण्या-नाशिकमधील रस्त्यांवरील खड्डे ही वस्तुस्थिती आहे. 'रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता' अशी परिस्थिती असताना सरकारने मोठे 'बिग तिकीट' प्रकल्प करण्यापेक्षा शाळा, आरोग्य केंद्रे, स्थानिक रस्ते आणि पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांवर खर्च करावा.

-------------

### राहुल गांधींचं फडणवीसांना पत्र अन

वसतिगृहात प्रवेशासाठी अशी कोणतीही अट असणार नाही,'' अशी माहिती मंत्री उईके यांनी दिली. तसंच आश्रमशाळेत सर्पदंशामुळे झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यू प्रकरणावरूनही उईके यांनी काँग्रेसवर पलटवार केला आहे. सदर आश्रमशाळा ही काँग्रेसच्याच एका नेत्याची आहे, ही माहिती राहुल गांधींना देण्यात आली नाही, असा टोला त्यांनी लगावला आहे.शासकीय आदिवासी वसतिगृहांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींबाबतचा २०२१चा शासन निर्णय लागू करावा, या मागणीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी मांजरी फार्म येथे १३ दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. ऑगस्ट २०२६मधील शासन निर्णय रद्द करून ११ नोव्हेंबर २०२१चा शासन निर्णय लागू करावा, शहराच्या मध्यवर्ती भागात शासकीय वसतिगृहे सुरू करावीत, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करावे, तसेच एव्हरेस्ट सर करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना सरकारी सेवेत सामावून घ्यावे, अशा मागण्या विद्यार्थ्यांनी आंदोलनादरम्यान केल्या आहेत.

-------------

### गोड साखर कडू झाल्यानंतर

देशांतर्गत बाजारात विकणे बंधनकारक आहे. यापूर्वी, आयात केलेली कच्ची साखर ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत देशांतर्गत बाजारात विकता यावी, यासाठी त्यावर वाजवी कालावधीत आणि ब-याच आधी प्रक्रिया करणे आवश्यक होते. आता मात्र, सुधारित नियमांनुसार प्रक्रिया आणि विक्रीसाठी दोन महिन्यांची कडक मुदत निश्चित करण्यात आली आहे.सरकारी आकडेवारीनुसार, एका महिन्यापूर्वी साखरेची किंमत प्रति किलो ४८.७३ रुपये होती, मात्र सोमवारी साखरेची अखिल भारतीय सरासरी किरकोळ किंमत प्रति किलो ६३.०५ रुपये एवढी वाढली आहे. म्हणजेच त्यात २९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. साखरेची कमाल किरकोळ किंमत प्रति किलो ७५ रुपयांपर्यंत पोहोचली होती.सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख टन साखर आयात करण्यास परवानगी दिली आहे आणि शीतपेये व आइस्क्रीम उत्पादक, तसेच संबंधित व्यापारी व मोठ्या प्रमाणात साखर वापरणा-यांसाठी साठवणुकीच्या मर्यादा निश्चित केल्या आहेत. मात्र साखरेचा साठा करून ठेवणे आणि काळा बाजार यांविरुद्ध कारवाई करावी, अशी विनंती देशभरातील राज्यांनी केंद्राकडे केली होती. त्यानुसार आता साखर आयात नियमांमधील बदलाबाबतची अधिसूचना वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जारी केली आहे.

--------

### मंत्रालयातील सर्व प्रतिनियुक्त्या

कार्यवाही १० सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.हे कर्मचारी मूळ कार्यालयात हजर झाल्याचा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी १५ सप्टेंबरपर्यंत सादर करायचा आहे.शासकीय आदेशाचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. जर संबंधित कर्मचारी दिलेल्या मुदतीत मूळ कार्यालयात हजर झाले नाहीत, तर त्यांचे वेतन तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.या संपूर्ण कारवाईचा आणि अंमलबजावणीचा सविस्तर अहवाल २० सप्टेंबरपर्यंत थेट मुख्य सचिव कार्यालयाला सादर करावा लागणार आहे. एबीपी माझाच्या बातमीमुळे मंत्रालयातील या बेकायदेशीर नियुक्तीच्या 'फिल्डिंग'ला मोठा सुरुंग लागला असून प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

------------

### बेरोजगारी! देशातील ८.७ कोटी

कडक वेळेचे कोर्सेस करणे अनेकांना शक्य होत नाही.देशाला २०४७ पर्यंत विकसित देश बनवायचे असेल, तर या तरुण शक्तीचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. त्यासाठी आयोगाने काही उपायही सुचवले आहेत. तरुणांना अत्यंत कमी खर्चात किंवा सबसिडीवर कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येऊ शकते. तसेच, शिकत असतानाच कमावण्याची सुविधा देण्यात येऊ शकते, जेणेकरून शिक्षणासोबत पैशांची अडचण येणार नाही. स्थानिक उद्योग आणि बाजारातील मागणीनुसार प्रशिक्षण कोर्सेस तयार करण्यात येऊ शकतात.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६


# रासायनिक खतांचा अतिवापर अन् संकरित वाणांच्या आक्रमणामुळे देशी बियाणे धोक्यात

## बदलत्या हवामानात 'पारंपरिक वाण' ठरणार वरदान: आदित्य महाविद्यालयात संवर्धनावर विशेष कार्यशाळा

बीड । प्रतिनिधी

बदलत्या हवामानात आणि रासायनिक खतांच्या अवाजवी वापरामुळे नामशेष होत असलेल्या पारंपरिक व देशी बी-बियाण्यांचे जतन करणे ही काळाची गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयात 'पारंपरिक/देशी बी-बियाण्यांचे संकलन व संवर्धन: शाश्वत कृषी विकासाचा पाया' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली. आधुनिक शेतीत पारंपरिक वाणांचे महत्त्व अधोरेखित करणे आणि शेतीचा शाश्वत विकास साधणे हा या आयोजनाचा मुख्य उद्देश होता.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेत लातूर येथील विलासराव देशमुख कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. योगेश भगत यांनी विद्यार्थ्यांना




मार्गदर्शन केले. ते म्हणाले, सध्या संकरित वाण आणि रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे आपले शेकडो वर्षांचे पारंपरिक व देशी वाण नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हे देशी वाण केवळ किडीला आणि रोगांना प्रतिकार करणारे नाहीत, तर कमी पावसातही उत्तम उत्पन्न देण्याची क्षमता त्यांच्यात आहे. पुढे बोलताना त्यांनी बियाण्यांच्या संकलनाच्या शास्त्रीय पद्धती, जतन करण्याचे तंत्रज्ञान आणि बदलत्या हवामानात या वाणांची उपयुक्तता यावर विस्तृत प्रकाश टाकला.

या प्रसंगी आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक आणि कृषी जैवतंत्रज्ञान शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भावी कृषी पदवीधरांनी स्वतःच्या शेतात आणि ग्रामीण भागात जाऊन देशी वाणांच्या प्रसारासाठी पुढाकार घ्यावा, असा सूर या वेळी मान्यवरांनी आळवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांची बाजी**

या कार्यशाळेचे मुख्य आकर्षण ठरलेली 'पारंपरिक बी-बियाणे: संकलन, संवर्धन व प्रसार' या विषयावरील प्रश्नमंजुषा स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडली. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यात हिरीरीने भाग घेतला. देशी वाणांचे विविध प्रकार, त्यांचे भौगोलिक स्थान, औषधी गुणधर्म आणि संवर्धन तंत्रज्ञान यासंबंधी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी अचूक उत्तरे दिली. या स्पर्धेतील विजेत्या आणि यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## थोडक्यात



### सुनिता नागरगोजे व ज्ञानेश्वर नागरगोजे यांचा भव्य सत्कार

बीड । प्रतिनिधी

बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच, महाराष्ट्र राज्य च्या बीड जिल्हा महिला अध्यक्षपदी सुनीता नागरगोजे यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे तसेच ज्ञानेश्वर नागरगोजे गायक यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली त्याबद्दल दोघांचाही शासकीय विश्रामगृह केज या ठिकाणी कला विश्र् समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच सांस्कृतिक क्षेत्रात बहुजन समाजाचे विचार तळागाळात पोहोचवण्यासाठी आणि महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ही निवड करण्यात आल्याचे संघटनेतर्फे सांगण्यात आले.

या निवडीबद्दल सुनीता नागरगोजे यांनी बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार सन्माननीय दत्ता शिंदे, उपाध्यक्ष तात्याराव झेंडे आणि कार्याध्यक्ष बाबासाहेब केदार सर यांचे विशेष आभार मानले आहेत. आपल्या निवडीवर बोलताना सुनीता नागरगोजे म्हणाल्या, वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेन. बीड जिल्ह्यातील महिला कलावंतांना एकत्र करून त्यांच्या हक्क व व्यासपीठ मिळवून देणे आणि लोककलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करणे हे माझे मुख्य उद्दिष्ट असेल. या निवडीबद्दल बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील विजय मस्के राज्य उपाध्यक्ष, बाबासाहेब साहेबराव गायकवाड जिल्हा सरचिटणीस , विठ्ठल अनेराव जिल्हाध्यक्ष , महादेव लिंबाजी ठोंबरे , अर्जुन किसन शिंदे जिल्हा संरक्षक प्रमुख, कला विश्व समितीचे सर्व सोबत सदस्य यांच्यासह बापू वैरागे यांनी या सत्काराचे आयोजन केले होते व इत्तर मान्यवरांकडून सुनीता नागरगोजे व गायक ज्ञानेश्वर नागरगोजे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### दशनाम गोसावी समाजाचे राज्यस्तरीय महाअधिवेशन २६ ऑगस्टला बीडमध्ये

माजलगाव : दशनाम गोसावी समाज परिषदे, महाराष्ट्र राज्य आणि मराठवाडा इनामी जमीन हक्क परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दशनाम गोसावी समाजाचे राज्यस्तरीय महाअधिवेशन बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.



या महाअधिवेशनास राज्याच्या ग्रामविकास व इतर प्रमुख विभागातील मंत्री मा. ना. पंकजा ताई मुंडे, मा. ना. अतुल सावे तसेच आमदार सुरेश धस, आमदार विजय सिंह पंडित आणि आमदार संदीप क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ‍ॅड. जगदेव गिरी (परभणी) राहणार आहेत. महाअधिवेशनाचे उद्घाटन ह.भ.प. नारायण महाराज गिरी व महादेव महाराज गिरी, चाकरवाडी यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून धर्मध्वज तसेच जगद्गुरू शंकराचार्य यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या अधिवेशनात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असून, गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार केला जाणार आहे. तसेच शिवव्याख्याते यशवंत गोसावी आणि युवा वक्ते राहुल गिरी यांचे प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे. दशनाम गोसावी समाजाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि हक्कांच्या प्रश्नांवर या महाअधिवेशनात विचारमंथन होणार असल्याने माजलगाव तालुक्यातील दशनाम गोसावी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मानव विकास संस्था, शेलापुरी, ता. माजलगाव, जि. बीड संचलित नागराज बांधकाम तंत्र हस्तकला अध्यापक महाविद्यालय, तेलगावचे अध्यक्ष हरी गिरी, प्रा. लक्ष्मण गिरी, प्रा. तात्या पुरी, दिगंबर गिरी, महादेव गिरी, भिमा गिरी, दत्ता गिरी आणि युवा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गिरी यांनी केले आहे. दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड. राजेंद्र बन, बाजीराव गिरी, आसाराम गिरी, मराठवाडा अध्यक्ष भास्कर गिरी, संजीव भारती व रवी बन यांच्या नेतृत्वाखाली हे महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.

# पत्रकार अरविंद ओव्हाळ, अशोक फपाळ यांना 'रायटर अँड फायटर' पुरस्कार जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील पत्रकार तथा निवासी संपादक अरविंद ओव्हाळ आणि वडवणी येथील पत्रकार अशोक फपाळ यांना यंदाचा प्रतिष्ठेचा 'रायटर अँड फायटर' पुरस्कार जाहीर झाला आहे. सत्यशोधन, निर्भीडता, निष्पक्षता आणि सामाजिक बांधिलकी जपत पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडल्याबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

या पुरस्काराचे वितरण लवकरच बीड शहरात मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येणाऱ्या दिमाखदार सोहळ्यात होणार आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे आहे. पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून





महत्त्वाची भूमिका बजावते. सत्याचा शोध घेणे, वस्तुस्थिती निष्पक्षपणे मांडणे आणि समाजातील उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणे, या निकषांवर 'रायटर अँड फायटर' पुरस्कारासाठी पत्रकारांची निवड केली जाते.

सत्तेतील यंत्रणा आणि प्रशासनाच्या कामावर लोकशाही पद्धतीने अंकुश ठेवण्याबरोबरच सर्वसामान्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडण्याचे काम अरविंद ओव्हाळ आणि अशोक फपाळ यांनी सातत्याने केले आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता तथ्याधारित आणि जबाबदार पत्रकारिता करण्याच्या त्यांच्या कार्याची दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली आहे.

निष्पक्ष पत्रकारितेची दखल :

अरविंद ओव्हाळ आणि अशोक फपाळ यांनी पत्रकारिता करताना खोट्या बातम्या, दिशाभूल करणारा प्रचार आणि दुजाभावापासून दूर राहून वस्तुस्थितीला प्राधान्य दिले. समाजातील विविध घटकांचे प्रश्न मांडताना त्यांनी सामाजिक हिताला केंद्रस्थानी ठेवले. निर्भीड आणि समाजाभिमुख पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना 'रायटर अँड फायटर' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बीड शहरात होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात दोन्ही पत्रकारांचा मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव करण्यात येणार आहे.

# आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नांना यश; सीना प्रकल्पातून आष्टी तालुक्यातील टँकरग्रस्त गावांना मिळणार दिलासा

आष्टी । प्रतिनिधी

सीना प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग वाढविण्याबाबत आ. सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. सीना प्रकल्पात सध्या ३१० क्युसेकने पाणी सोडण्यात येत असून, यामुळे आष्टी तालुक्यातील टँकरग्रस्त गावांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कुकडी प्रकल्पातून भोसे खिंडद्वारे सीना मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्यात येते. मात्र सीना प्रकल्पातून यापूर्वी २०० क्युसेकपेक्षा कमी क्षमतेने पाणी सोडले जात असल्याने अपेक्षित प्रमाणात पाणी पुढे पोहोचत नव्हते. त्यामुळे आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण



झाला होता.

ही बाब लक्षात घेऊन आ. सुरेश धस यांनी सीना कालव्याच्या कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या. कालव्याच्या प्रवाहात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाण्याचा मार्ग बाधित होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे सीना प्रकल्पातून अपेक्षित क्षमतेने पाणी पोहोचत नव्हते.

आ. धस यांच्या पाठपुराव्यानंतर संबंधित यंत्रणेने उपाययोजना सुरू केल्या असून, टँकरग्रस्त गावांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे. तसेच कालव्यातील अडथळे दूर करण्यासाठीही प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

**मंगळावर पासून ४०० क्युसेक क्षमतेने पाणी सोडण्यात आले...**

दरम्यान, आजपासून कुकडी धरणातून सीना प्रकल्पाकडे ४०० क्युसेक क्षमतेने पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे. त्यानंतर सीना प्रकल्पातील पाणी तातडीने मेहकरी प्रकल्पाकडे सोडण्यात येणार आहे. या निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील सीना प्रकल्पालगतच्या गावांचा तसेच टँकरद्वारे सुरू असलेल्या पिण्याच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मोठी मदत होणार आहे.

आष्टी तालुक्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आ. सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टँकरग्रस्त गावांना मोठा दिलासा मिळणार असून, आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## भिमराव सोळंके यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गंगामसला येथील माजलगाव सह.साखर कारखान्याचे माजी संचालक,शिक्षक तथा नॅशनल कुस्ती पटु भिमराव घनशामराव सोळंके यांचे वृद्धापकाळाने दि २३ ऑगस्ट रविवार रोजी रात्री १०:३० वाजता दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९२ वर्ष होते. २४ ऑगस्ट सोमवार रोजी दुपारी १२:०० वाजता गंगामसला येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले व दोन मुली असा परिवार आहे.गंगामसला येथील प्रगतशील शेतकरी विजयसिंह भीमराव सोळंके यांचे ते वडील होत.



# रेणुकामाता संस्थानातील शिवमहापुराण कथेचा प्रारंभ; महिलांसह शिवभक्तांची मोठी उपस्थिती

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिवमहापुराण कथेचा प्रारंभ काल दि.२४ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजीपासून झाला आहे. कथेच्या या पहिल्या दिवशीच वडवणी सह पंचक्रोशीतील तमाम महिला भाविक व शिवभक्तांनी याठिकाणी मोठी गर्दी केली होती. त्याचप्रमाणे राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची यावेळी उपस्थिती लाभली. शिवमहापुराण कथेचे श्रवण करणे हे देखील एकप्रकारे जिवनाला नवी कलाटणी देणारी संधी ठरु शकते यासाठी उद्यापासून याठिकाणी आणखी गर्दी वाढू शकते असा अंदाज संयोजकांनी व्यक्त केला आहे.

वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिवमहापुराण कथेची सुरुवात काल दुसरा श्रावण सोमवारी म्हणजेच दि.२४ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजीपासून दैनंदिन सकाळी ११ ते २ या वेळेत संस्थान सभामंडपात झालेली आहे. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.शालीग्राम महाराज मते लोणीकर यांच्या वाणीतून या



शिवमहापुराण कथेचे हृदयस्पर्शी असे विवेचन ऐकण्याची उत्तम संधी भाविकांना मिळाली आहे. त्यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबवली जात आहे. याप्रसंगी सिंथ वादक ह.भ.प.माऊली महाराज घुमरे, तर तबला वादक ह.भ.प.जगन्नाथ महाराज कराळे यांची त्यांना साथ लाभली आहे. तरी वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणी ठरत असून या कथेची सांगता दि.३१ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी भव्य महाप्रसादाने होणार आहे. दरम्यान शिवमहापुराण कथा सप्ताहातील प्रमुख आकर्षण म्हणून शनिवार, दि.२९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी रुद्राभिषेकाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. विधिवत पूजा व मंत्रोच्चारात भगवान शिवाचा रुद्राभिषेक करण्यात येणार आहे. या दिवशी परिसरातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रुद्राभिषेकाचा धार्मिक लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. तसेच रविवार, दि.३० ऑगस्ट २०२६ रोजी श्री.दत्तात्रेय मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चा व मंत्रोच्चाराने हा सोहळा संपन्न होणार आहे. दरम्यान याठिकाणी शिवमहापुराण कथेच्या आयोजनाचे हे सलग दुसरे वर्ष असून अण्णा महाराज दुटाळ यांनी आपण यापुढील काळातही प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यात याच ठिकाणी या शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्याचे भाविकांना दिलेल्या वचनाचे त्यांनी तंतोतंत पालन केले आहे. वडवणीसह पंचक्रोशीतील महिला, माता भगिनींसह सर्व शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिवमहापुराण कथेच्या दैनंदिन श्रवणासाठी गर्दी केली जात आहे. शिवमहापुराण कथेचे श्रवण करणे हे देखील एकप्रकारे जिवनाला नवी कलाटणी देणारी संधी ठरु शकते त्यामुळे यासाठी उद्यापासून याठिकाणी आणखी गर्दी वाढू शकते असा अंदाज संयोजकांनी व्यक्त केला आहे.

## पान ६ वरुन...

### भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या

अल्पसंख्याक चेहरा असूनही त्यांनी ज्या पद्धतीने भाजपमध्ये आपली कमांड निर्माण केली आहे ती खरोखरच उल्लेखनीय आहे. सलीम जहाँगीर यांची निष्ठा, प्रामाणिकता आणि उत्कृष्ट संघटन बांधणी पाहता पक्ष श्रेष्ठींनी मराठवाड्यातून एकमेव त्यांची निवड करत त्यांच्यावर भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री म्हणून जबाबदारी सोपवली आहे. या निवडीबद्दल सलीम जहाँगीर यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

### जाणीव प्रतिष्ठानच्या मोफत

व्यक्ती आढळून आल्यास नागरिकांनी तत्काळ प्रतिष्ठानचे संस्थापक ड. विवेकानंद सानप यांच्याशी संपर्क साधावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

संपर्क : अ‍ॅड. विवेकानंद सानप - ९१३००५८८६

गरजूंसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या निःस्वार्थ सेवाकार्याला बदनाम करणाऱ्या किंवा त्याच्या नावाचा गैरवापर करून आर्थिक फसवणूक करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन अँड. विवेकानंद सानप बबनराव गवते बापू, अविनाश काळे,तुकाराम पवार,प्रा. ज्ञानेश्वर मुंडे,दिलीप गोरे, अशोक धांडे,डॉ. अविनाश देशपांडे, शैलेश लहाने, डॉक्टर सुरज कोकणे डॉक्टर प्रशांत सानप राम काशीद,अँड.सुभाष पिसुरे,डॉ. गणेश वाघमारे,संभाजी मंदे अँड. हनुमान शिंदे आदींनी केले आहे.

### जनगणनेचे काम पूर्ण

यांच्या वतीने मानधन तातडीने अदा करण्याची मागणी करण्यात आली आहे.मानधनाचा प्रश्न त्वरित मार्गी न लागल्यास ३ सप्टेंबर २०२६ पासून माजलगाव नगर परिषद कार्यालयासमोर शांततामय बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशाराही महासंघाने दिला आहे.काम पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला वेळेत मिळणार का? याकडे आता संबंधितांचे लक्ष लागले आहे.

### सुभेदार मेजर सतीश

निवृत्त होत आहे.ऑलिव्ह ग्रीन गणवेश परिधान करणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान आहे. प्रत्येक आव्हान प्रत्येक जबाबदारी आणि प्रत्येक यशाने मला आजची व्यक्ती म्हणून घडवले आहे. माझ्या संपूर्ण कारकिर्दीत खंबीर पाठिंबा दिल्याबद्दल मी माझे वरिष्ठ, सहकारी अधिकारी, जेसी ओ, ओआर आणि माझ्या कुटुंबाचा मनापासून आभारी आहे.

सक्रिय सेवेला निरोप देताना, मी प्रचंड अभिमान, जपलेल्या आठवणी, आयुष्यभराची मैत्री आणि माझ्या देशाची सन्मानाने आणि व निष्ठेने सेवा केल्याच्या समाधानासह हा निरोप घेत आहे. जरी मी सैन्यातून निवृत्त होत असलो तरी शिस्त, सचोटी, धैर्य आणि निःस्वार्थ सेवेची मूल्ये माझ्यासोबत कायम राहतील.या अविश्वसनीय प्रवासाचा भाग असल्याचे त्यांनी यावेळी आभार व्यक्त करताना सुभेदार मेजर सतीश लादे यांनी स्वतःच्या भावना व्यक्त केल्या आहेत. येत्या शनिवारी दि.८ऑगस्ट रोजी पुणे स्थित सेवपूर्तीचा भव्य कार्यक्रम आयोजित केला असून जाणिव प्रतिष्टान च्या वतीने सेवपूर्ती निमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

### राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे

लावत होते. रामकिसन महाराजांची तब्येत चांगली होती. आळंदी येथे मागील काही दिवसांपासून ते गेले होते. त्या ठिकाणी त्यांची तब्येत अचानक ढासळली. त्यांना निमोनियाचा प्रादुर्भाव झाला. तीन दिवसांपूर्वी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र सोमवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची वार्ता समजल्यानंतर बीड जिल्ह्यातील वारकरी संप्रदायावर शोक पसरला आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दुपारी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर टाळ मृदंगाच्या गजरात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्यासह या भागातील सर्व सांप्रदायिक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या महान विचारांची प्रेरणा मिळत राहील. हा निर्णय केवळ विकासकामाचा नाही, तर महापुरुषांच्या विचारांचा सन्मान करण्याचा निर्णय आहे.

पाटोदा शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार सुरेश अण्णा धस यांचे पाटोदा शहराच्या वतीने मनःपूर्वक आभार!

तसेच या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या सर्व सामाजिक कार्यकर्ते, भीमसैनिक, अण्णाभाऊ साठे प्रेमी, नागरिक आणि पदाधिकाऱ्यांचेही मनःपूर्वक अभिनंदन व आभार.

महापुरुषांचा सन्मान शहराचा विकास समाजाची एकजूट
किशोर अडागळे
सभापती, न. प. पाटोदा
डॉ.नरेंद्र जावळे.. अध्यक्ष..

### संध्या गायकवाड प्रकरणी

अस्लम कुरेशी, अमरसिंह मस्के, शिवराज बांगर, प्रेम कांबळे, कचरू खळगे, श्रीहरी मोरे, बाबा बाघमारे, बाबासाहेब राळवे, यांच्यासह समाज बांधव सर्वपक्षीय नेते मंडल कार्यकर्ते नोठ्या संख्येनेउपस्थित होते.

आर्थिक मदतीचे आव्हान

संध्या गायकवाड यांचे कुटुंब अतिशय गरीब असून तिच्या उपचाराकाठी आईने स्वतःचे सोने गहाण ठेवून उपचार करत आहे. तिच्या उपचारासाठी आर्थिक मदत मिळावी, यालठी या सत्त ऐको दरम्यान भन्छन पोटघरे यांनी केले होते. त्यांच्या हाकेला मोर्चेकरांनी देखील नाथ दिली असून य कुटुचाला सर्वस्तरातून आर्थिक मदत द्यावी, असे आव्हान देखील करण्यात आले आहे.

# साधे पण शक्तिशाली जैविक खत : जीवामृत

आधुनिक शेती अनेकदा महागड्या रासायनिक खतांवरील अवलंबित्वामुळे त्रस्त असते, जी दीर्घकाळात जमिनीच्या आरोग्याला हानी पोहोचवतात. संपूर्ण भारतातील शेतकरी अशा पर्यायांच्या शोधात आहेत, जे त्यांच्या पिकांना पोषण देण्यासोबतच भावी पिढ्यांसाठी जमीन सुपीक ठेवतील. असाच एक उपाय, ज्याने प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे, तो म्हणजे जीवामृत, एक साधे पण शक्तिशाली जैविक खत. या शब्दाचा अर्थच जीवनाचा अमृत आहे, आणि तो अगदी योग्य आहे, कारण ते जमिनीला सूक्ष्मजीव आणि सेंद्रिय पोषक तत्वांनी समृद्ध करून तिच्यात प्राण फुंकते. जीवामृत हे विकत घ्यावे लागणारे व्यावसायिक उत्पादन नाही; उलट, शेतकरी त्यांच्या घरात आणि शेतात आधीपासूनच उपलब्ध असलेल्या साधनांचा वापर करून ते सहजपणे स्वतः तयार करू शकतात. यामुळे ही एक शेतकरी-स्नेही आणि किफायतशीर पद्धत ठरते, जी नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीच्या तत्त्वांना पूर्णपणे अनुकूल आहे.

जीवामृत बनवण्यासाठी लागणारे साहित्य : जीवामृत तयार करण्यासाठी, शेण आणि गोमूत्र हे सर्वात महत्त्वाचे घटक आहेत, शक्यतो देशी गायींचे , कारण त्यात फायदेशीर सूक्ष्मजीव भरपूर प्रमाणात असतात. सुमारे दहा किलो शेण आणि आठ ते दहा लिटर गोमूत्र हा त्याचा आधार असतो. या मिश्रणात शेतकरी एक ते दोन किलो गूळ घालतात, जो सूक्ष्मजीवांसाठी अन्नाचा स्रोत म्हणून काम करतो,



आणि एक ते दोन किलो बेसन घालतात, जे सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता वाढवते आणि अतिरिक्त पोषक तत्वे पुरवते. मिश्रण पातळ करण्यासाठी त्यात सुमारे १८० लिटर पाणी घातले जाते आणि शेवटी, द्रावणात नैसर्गिक मातीतील सूक्ष्मजीव आणण्यासाठी झाडाखालची सुमारे एक किलो माती मिसळली जाते. हे सर्व साहित्य प्लास्टिकच्या ड्रममध्ये किंवा मातीच्या भांड्यात एकत्र ढवळले जाते आणि अशा प्रकारे नैसर्गिक द्रव खत तयार होऊ लागते.

तयार करण्याची पद्धत : जीवामृत बनवण्याची प्रक्रिया त्याच्या घटकांइतकीच सोपी आहे. मिश्रण तयार झाल्यावर, ते सावलीच्या ठिकाणी दोन दिवस आंबवण्यासाठी ठेवले जाते.

शेतकऱ्यांना सल्ला दिला जातो की, मिश्रण व्यवस्थित मिसळावे आणि त्याला हवा खेळती राहावी यासाठी त्यांनी दिवसातून दोनदा, सकाळी आणि संध्याकाळी, ते ढवळावे. आंबवण्याचा कालावधी ऋतूनुसार बदलतो. उन्हाळ्यात जीवामृत सात दिवसांत तयार होते, तर हिवाळ्यात पूर्णपणे आंबवण्यासाठी आठ ते पंधरा दिवस लागू शकतात. अंतिम उत्पादन हे पोषक तत्वांनी समृद्ध आणि सूक्ष्मजीवांनी युक्त असे द्रव असते, जे शेतांवर वापरले जाऊ शकते.

शेतकऱ्यांसाठी फायदे : जीवामृतचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्याची किफायतशीरता. यातील घटक शेतीवर आधारित आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध असल्यामुळे, शेतकऱ्यांना खतांवर जास्त खर्च करण्याची गरज भासत नाही. यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पन्नही वाढते. शिवाय, ते जमिनीचे आरोग्य पुनरुज्जीवित करण्यास मदत करते , जे शाश्वत शेतीसाठी आवश्यक आहे. जीवामृतचा वापर करून, शेतकरी केवळ चांगली पिकेच घेत नाहीत, तर रासायनिक खतांचा वापर कमी झाल्यामुळे स्वच्छ पर्यावरणासाठीही योगदान देतात. याचा आणखी एक फायदा म्हणजे, शेतीच्या प्रमाणानुसार ते कमी किंवा जास्त प्रमाणात तयार करता येते, ज्यामुळे ते लहान आणि मोठे शेतकरी दोघांसाठीही सोयीचे ठरते.

जीवामृत हे केवळ शेतीसाठीचे एक साधन नाही; ते नैसर्गिक शेतीचे एक प्रतीक आहे, जे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य देते. ते सोपे, परवडणारे आणि प्रभावी आहे, ज्यामुळे ते कृषी समुदायासाठी एक अमूल्य साधन ठरते. जेव्हा शेतकरी ही पद्धत अवलंबतात, तेव्हा ते केवळ स्वतःसाठी चांगल्या पिकांची खात्रीच करत नाहीत, तर भावी पिढ्यांसाठी आपल्या जमिनीची सुपीकतादेखील जतन करतात. खरोखरच, जीवामृत हे जमीन आणि शेतकरी या दोघांसाठीही जीवनामृत आहे.

# फळझाडांना द्या संतुलित खते



फळझाडांच्या लागवडीचे यशापयश हे जमीन, हवामान, खत व्यवस्थापन आणि पाणी पुरवठा यावर विशेष अवलंबून आहे.यापैकी खत व्यवस्थापनास अन्यन साधारण महत्व आहे. फळझाडांची लागवड केल्यानंतर नियमित आणि भरपूर उत्तम दर्जाची फळे येण्यासाठी जमीन सुपीक ठेवणे जरुरीचे आहे. फळझाडांची वाढ आणि त्यावर होणारी फलधारणा जमिनीतून मिळणाऱ्या पोषक अन्नद्रव्यांवर आणि स्थानिक हवामानावर अवलंबून असते.त्यामुळे या दोन महत्वाच्या बाबीपैकी जमिनीच्या सुपिकतेकडे लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. जमिनीच्या सुपिकतेकडे दुर्लक्ष झाल्यास झाडांची वाढ कमी होते आणि झाडे किडी व रोगास बळी पडतात.झाडांची वाढ निकोप व्हावी म्हणून योग्य मशागत, तणांचा बंदोबस्त, खतांचा संतुलित पुरवठा, सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन म्हणून वापर,आच्छादनाची पिके, आंतरपिके इत्यादी मार्गांनी जमिनीची सुपिकता चांगली ठेवणे फायदेशीर ठरते.

फळ झाडांना खते देण्याची योग्य वेळ : सर्वसाधारणपणे फळझाडांना जून-जुलै, सप्टेंबर-ऑक्टोबर व जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यात खते द्यावीत. परंतू खते देताना प्रत्येक फळझाडाचा बहार येण्याचा व फळे पक्क होण्याचा कालावधी लक्षात घेऊन खते द्यावीत.सर्वसाधारणपणे जून-जुलै महिन्यात संपूर्ण शेणखत अथवा कंपोस्ट खत,संपूर्ण स्फुरद व पालाश ची मात्रा द्यावी. नत्राची मात्रा एक ते दोन हप्त्यात विभागून द्यावी. खते देण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्यावा.

फळझाडांना खते देण्याची पद्धत : खताची मात्रा देताना मोठ्या विस्ताराखाली खोडापासून एक मीटर लांब ४० ते ५० से.मी. रुंद आणि १५ से. मी. खोल वर्तुळाकार चर काढावा.प्रथम चरात पालापाचोळा आणि शेणखत नंतर रासायनिक खते सर्व बाजूनी टाकावी नंतर चर मातीने बुजवावा.

# केळीवरील कुकुंबर मोझॅक रोगाचे नियंत्रण

केळी पिकावर विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असतो. बदलते वातावरण आणि ढगाळ हवामान यामुळे रस शोषणाऱ्या किडी चा प्रादुर्भाव जास्त दिसून येतो. गेल्या २-३ वर्षांपासून केळीवर ककुंबर मोझॅक विषाणू (सी.एम.व्ही.) प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून येत आहे. स्थानिक भाषेत या रोगास 'हरण्या' असे म्हटले जाते. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे केळी उत्पादनात मोठी घट येते. विषाणूजन्य रोगाचे नियंत्रण करणे शक्य नसले तरी रोगाचा प्रादुर्भाव टाळणे आणि प्रसार रोखणे शक्य आहे. यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब फायदेशीर ठरतो.



अनुकूल घटक : सततचे ढगाळ वातावरण, सतत पाऊस, कमी तापमान, जास्त आर्द्रता हे घटक रोगाच्या वाढीसाठी पोषक ठरतात. यासोबतच रोगयुक्त लागवड साहित्य, तन नियंत्रणाचा अभाव, अन्नद्रव्यांची कमतरता हे घटक रोगाच्या प्रादुर्भावास कारणीभूत आहेत. रोगाचा प्राथमिक प्रसार लागवड साहित्य मार्फत आणि दुय्यम प्रसार 'मावा' किडी मार्फत होतो. या विषाणूची जवळपास ८०० ते १००० यजमान पिके आहेत. यात काकडी, भोपळा, कारली, दुधीभोपळा, गिलके, चवळी, टोमॅटो, वांगी, मिरची तसेच एकदल व द्विदल पिकांचा समावेश होतो. पीक फेरपालट पद्धतीचा अभाव हे देखील प्रमुख कारण आहे.


लक्षणे : सुरुवातीला कोवळ्या पानांवर हरितद्रव्य विरहित, पिवळसर पट्टे दिसतात. हे पट्टे तुटक किंवा संपूर्ण पानावर आढळून येतात. एका पानावर १ ते २ अर्धवट आकाराचे किंवा पूर्ण पानभर पसरलेले पट्टे दिसतात. कालांतराने पानाचा पृष्ठभाग आकसला जाऊन कडा वाकड्या होतात. पानांचा आकार लहान होतो. नवीन येणारी पाने आकाराने लहान होतात. पानाच्या देठाची लांबी कमी होऊन पाने जवळ येतात. पानांच्या शिरा ताठर होऊन संपूर्ण पान कडक होते. पान हाताने दाबल्यास कडकड आवाज होतो. पानांच्या शिरांमधील भाग काळपट पडून तेथील उती मरतात. पाने फाटतात. प्रादुर्भाव जास्त झाल्यास, पाने पिवळी पडून पोंगा सडतो. झाडांची वाढ खुंटते. प्रादुर्भावग्रस्त झाडांची निसवण उशिरा तसेच अनियमित होऊन फण्या अत्यंत लहान होतात. फळे विकृत आकाराची होऊन त्यावर पिवळ्या किंवा काळ्या रंगाच्या रेषा दिसतात. अशी विक्रीसाठी योग्य नसतात.

नियंत्रण : केळीची बाग व्हायरस मुक्त ठेवण्यासाठी मशागतीच्या पद्धती व व्हेक्टरचे नियंत्रण महत्वाचे आहे. केळी लागवडीसाठी रोग मुक्त व व्हायरस इंडेक्सिंग केलेल्या टिश्यू कल्चर रोपांची लागवड करावी. बाग तण मुक्त ठेवावी कारण अनेक तणे रोगाची जोपासना करतात. बागे शेजारी मका, कापुस, चवळी, काकडी, घोसाळे, टोमॅटो, टरबुज, मिरची, ऊस या सारख्या पिकांची लागवड करु नये. जुलै, ऑगस्ट,सप्टेंबर, नोव्हेंबर व डिसेंबर च्या लागवडीवर सीएमव्ही रोग येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे या लागवडीची विशेष काळजी घ्यावी. रोगांचा प्रसार करणाऱ्या रसशोषक क़िडींचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे आहे. सीएमव्ही रोगग्रस्त झाडातुन व्हायरस मुक्त होऊ शकत नाही त्यामुळे रोगग्रस्त झाडे उपटून टाकावी. क्लोरोपायरीफॉस, टर्मिनेटर, ऍग्रोसिस, ४५ मिली + निमअर्क ५० मी + स्टिकर २५ मिली १५ लि. पाण्यात किंवा असिटामॅप्रिड, धनप्रीत, धानुका, ६ ग्रॅम + निमअर्क ५० मी + स्टिकर २५ मिली १५ लि. पाण्यात घेवून आठवड्याच्या अंतराने फवारणी करावी.

# खरीपातील पिकांचे आणि फळझाडांचे नियोजन; जाणून घ्या कृषी तज्ज्ञांची माहिती

सध्या खरीप पिकांची पेरणी पूर्ण झालेली आहे तर काही ठिकाणी ती सुरु आहे. वेगवेगळ्या खरीप व फळ पिकात आंतर मशागतीची कामे, कीड आणि रोग नियंत्रण फवारणी, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर व इतर कामे सुरु आहेत. कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी पिकांच्या वेगवेगळ्या अवस्थेत काय काळजी घ्यावी याबद्दल शिफारस केलेली आहे.

खरीप पिकाचे नियोजन : कापूस पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा ॲसिटामॅप्रिड २० % २ ग्रॅम प्रति १० लिटर किंवा फलोनिकॅमिड ५०% ६० ग्रॅम प्रति एकर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. कापूस पिकाची लागवड करून एक महिना झाला असल्यास कोरडवाहू कापसाला ३१ किलो नत्र प्रति हेक्टरी तर बागायती कापसाला ५२ किलो नत्र प्रति हेक्टरी वरखताची मात्रा द्यावी. कापूस पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. कापूस पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. सुक्ष्म अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे तूर पिक पिवळे दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ईडीटीए चिलेटेड मिक्स मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड-२ ५० ग्रॅम किंवा ५० मिली + १९:१९:१९ खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. तूर पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. तूर पिकात पाणी साचून राहणार



नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मूग/उडीद पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मूग/उडीद पिकात मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची पावसाची उघड बघून फवारणी करावी. उडीद पिकात करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. खोड माशीच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ ईसी किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ एसएल १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. भुईमुग पिकात जमिनीत वापसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मका पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील कीटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असताना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी. मका पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

फळबागेचे व्यवस्थापन : केळी बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. केळी बागेतील रोगग्रस्त पाने काढून टाकावीत. केळी बागेस ५० ग्रॅम यूरिया प्रति झाड खतमात्रा द्यावी. केळी बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. आंबा बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

रस शोषण करणाऱ्या किडींच्या व्यवस्थापनासाठी इमिडाक्लोप्रिड ४ ते ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. द्राक्ष बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. रोगग्रस्त पानाची विरळणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. सिताफळ बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. सिताफळ बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी.




## महत्वाच्या घटना

१३०३ : अल्लाउद्दीन खिलजीने चित्तोडगड जिंकले.
१४९८ : मायकेल अँजेलो याने 'पिएटा' या जगप्रसिद्ध शिल्पकृतीच्या कामास सुरूवात केली.
१७६८ : कॅप्टन जेम्स कूक एच. एम. एस. एन्डेव्हर या जहाजातुन आपल्या पहिल्या सफरीवर निघाला.
१७९१ : जॉन फिच यांना स्टीमबोट साठी अमेरिकेचे पेटंट देण्यात आले.
१८८३ : डच इंडीज (सध्याचे इंडोनेशिया) बेटावरील क्राकाटाऊ ज्वालामुखीच्या उद्रेकात १३५ गावे भस्मसात होऊन सुमारे ३६,००० लोकांचा बळी गेला.
१९२० : अमेरिकेतील महिलांना १९६५ च्या कायद्या अंतर्गत मतदान करण्याचा अधिकार मिळाला.
१९४४ : दुसरे महायुद्ध चार्ल्स द गॉलने पॅरिसमधे प्रवेश केला.
१९७२ : पश्चिम जर्मनीतील म्युनिच येथे २० व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९४ : लोन टेनिसपटू रमेश कृष्णन आणि मध्यम पल्ल्याचा धावपटू बहादूर प्रसाद यांना के. के. बिर्ला फांउंडेशनचा पुरस्कार जाहीर
१९९६ : दक्षिण कोरियात १९७९ मध्ये झालेल्या लष्करी कटाबद्दल माजी अध्यक्ष चुन दू वान यांना मृत्यूदंडाची तर त्यांचे उत्तराधिकारी प्रो ताय वू यांना साडेबावीस वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.
२००२ : दक्षिण अफ्रिकेच्या जोहान्सबर्ग शहरांत दहा दिवसांच्या पृथ्वी शिखर परिषदेस प्रारंभ झाला.
२००८ : भारतीय तेलगु चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता चिरंजीवी यांनी आपला नवीन पक्ष प्रजा राज्यम पक्षाची स्थापना करून आंध्र प्रदेश राज्यातील तिरुपती या ठिकाणी पहिली सभा घेतली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४० : हॉट एअर बलून चे शोधक जोसेफ-मायकेल मॉन्टगॉल्फ़र यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑक्टोबर १८१०)
१७४३ : ॲन्टॉइन लॅव्हाझिये फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ, आधुनिक रसायनशास्त्राचा जनक (मृत्यू: ८ मे १७९४)
१८९१ : भारतीय हिंदी साहित्याचे लेखक व कादंबरीकार आचार्य चतुरसेन शास्त्री यांचा जन्मदिन.
१९१० : मदर तेरेसा शांततेचा नोबल पुरस्कार तसचं, भारतीय सर्वोच्च नागीर पुरस्कार भारतरत्न सन्मानित अल्बेनियन-भारतीय रोमन कॅथोलिक धर्मगुरू व समाजसेविका (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९७)
१९२२ : ग. प्र. प्रधान समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी, लेखक, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती. 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभार', 'लोकमान्य टिळक', हाजी पीर', 'सोनार बांगला', 'भाकरी आणि स्वातंत्र्य' इ. मराठीतील पुस्तके प्रसिद्ध आहेत. (मृत्यू: २९ मे २०१०)
१९२७ : बी. व्ही. दोशी प्रख्यात वास्तुविशारद
१९२७ : भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता, ज्येष्ठ काँग्रेस नेता, व हरियाणा राज्याचे माजी मुख्यमंत्री बंसीलाल यांचा जन्मदिन.
१९२८ : हिरो साइकिलचे सहसंस्थापक ओम प्रकाश मंजाल यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट २०१५)
१९४४ : अनिल अवचट लेखक व सामाजिक कार्यकर्ते
१९५६ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व देशाच्या प्रथम पंतप्रधान महिला इंदिरा गांधी यांचे दिवंगत पुत्र संजय गांधी यांच्या पत्नी मेनका गांधी यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२३ : अँथनी व्हॉन लीवेनहॉक डच सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (जन्म: २४ आक्टोबर १६३२)
१९२७ : त्यांनी पॅरिस ते न्यूयॉर्क या ५,८०० किलोमीटरच्या विनाथांबा विमानोड्डाण स्पर्धेत भाग घेऊन साडे तेहतीस तासांत ती स्पर्धा जिंकली. वैमानिकी जीवनाच्या अनुभवांवरील त्यांच्या 'द स्पिरीट ऑफ सेंट लुईस' या पुस्तकास पुलित्झर पुरस्कार मिळाला. (जन्म: ४ फेब्रुवारी १९०२)
१९३४ : प्रसिद्ध भारतीय बंगाली संगीतकार, गीतकार आणि गायक, तसचं, महान कायदेपंडित, परोपकारी, समाजसेवक, शिक्षणतज्ञ आणि साहित्यिक अतुल प्रसाद सेन यांचे निधन.
१९४८ : कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ख्यातनाम महाराष्ट्रीयन मराठी साहित्यकार, लेखक, नाट्याचार्य, पत्रकार आणि लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांचे सहकारी व केसरी वृत्तपत्राचे संपादक व नवाकाळ वृत्तपत्राचे संस्थापक (जन्म: २५ नोव्हेंबर १८७२)
१९५५ : मुंबई मराठी साहित्य संघाचे संस्थापक अ. ना. भालेराव यांचे निधन.
१९५५ : मल्याळी चित्रपट अभिनेते बालन के. नायर यांचे निधन.
१९७४ : चार्ल्स ऑगस्टस लिंडबर्ग धाडसी अमेरिकन वैमानिक.
१९७५ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी आणि काँग्रेस सेवा दलाचे संस्थापक व राजकारणी डॉ. नारायण सुब्बाराव हार्दिकर यांचे निधन.
१९९९ : नरेन्द्रनाथ डेव्हिस करंडक लॉन टेनिसपटू (जन्म:)
२०१२ : ए. के. हनगल पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वातंत्र्यसेनानी, हिंदी चित्रपट व रंगमंच अभिनेते (जन्म: १ फेब्रुवारी १९१७)



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत


बुधवार दि.२६ ऑगस्ट २०२६ ५




# जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे तात्काळ फायर व इलेक्ट्रिकल ऑडिट करावे-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना। प्रतिनिधी

अमरावती येथील रुग्णालयात घडलेल्या दुर्दैवी आगीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांच्या अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षेचा तातडीने आढावा घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील महिला व बाल रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच इतर सर्व शासकीय आरोग्य संस्थांचे फायर ऑडिट आणि इलेक्ट्रिकल ऑडिट तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.यासंदर्भात जिल्हाधिकारी मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज संबंधित विभागांची ऑनलाईन आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जालना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग तसेच संबंधित आरोग्य व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. रुग्णालयांच्या सुरक्षा ऑडिटदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींची केवळ नोंद करून न थांबता त्यावर तातडीने सुधारात्मक कार्यवाही करण्यात यावी. संबंधित यंत्रणांनी केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन सुनिश्चित करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.



विशेषतः महिला व बाल रुग्णालयातील , , प्रसूती कक्ष, बालरुग्ण विभाग, , ऑपरेशन थिएटर आणि ऑक्सिजन सुविधा असलेल्या विभागांची प्राधान्याने तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची व्यवस्था सक्षम आहे की नाही, याची प्रत्यक्ष पाहणी करण्यावर भर देण्यात आला आहे. फायर ऑडिटमध्ये फायर एक्स्टिंग्विशर, फायर अलार्म, स्मोक डिटेक्टर, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग तसेच रुग्णालयातील अग्निसुरक्षेच्या अन्य उपाययोजनांची कार्यक्षमता तपासण्यात येणार आहे. त्याचबरोबर विद्युत वायरिंग, विद्युत पॅनेल, अर्थिंग, जनरेटर आणि इतर विद्युत उपकरणांची कार्यस्थितीही प्रत्यक्ष तपासण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले. रुग्णालयांमध्ये आग किंवा अन्य आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास कोणत्या पद्धतीने रुग्णांचे स्थलांतर करायचे, यासाठी प्रत्येक आरोग्य संस्थेने स्पष्ट तयार ठेवावा. या योजनेत नवजात बालके, गर्भवती व प्रसूती झालेल्या महिला, दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, मधील रुग्ण तसेच हालचाल करण्यास असमर्थ रुग्णांच्या सुरक्षित आणि जलद स्थलांतरासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करावी, असेही सांगण्यात आले. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अग्निसुरक्षा प्रशिक्षणासोबत प्रत्यक्ष मॉकड्रिल घेण्याचे निर्देश ही यावेळी देण्यात आले आहेत.

डॉक्टर, परिचारिका, तांत्रिक कर्मचारी, सुरक्षारक्षक आणि अन्य रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना आग लागल्यानंतर करावयाच्या प्रथम प्रतिसादाची माहिती देण्यात यावी. अग्निशमन उपकरणांचा योग्य वापर, फायर अलार्म यंत्रणा, आपत्कालीन संपर्क व्यवस्था आणि रुग्णांचे सुरक्षित स्थलांतर याबाबत कर्मचाऱ्यांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात यावे.

आपत्कालीन परिस्थितीत कोणत्याही प्रकारची गोंधळाची स्थिती निर्माण होऊ नये, यासाठी नियमित सराव करण्यावरही भर देण्यात आला. "रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची सुरक्षा ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. विशेषतः महिला, नवजात बालके, लहान मुले, दिव्यांग व्यक्ती आणि अतिदक्षता विभागातील रुग्ण आपत्कालीन परिस्थितीत अधिक असुरक्षित असतात. त्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षेबाबत कोणत्याही स्तरावरील निष्काळजीपणा स्वीकारला जाणार नाही. संभाव्य धोका आधीच ओळखून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात," असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

फायर ऑडिट, इलेक्ट्रिकल ऑडिट, ऑडिटमध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता, मॉकड्रिल आणि कर्मचारी प्रशिक्षण या सर्व बाबींवर आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचा विद्युत विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी परस्पर समन्वयाने तातडीने कार्यवाही करावी. या सर्व कार्यवाहीचा अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिले.

## पाथर्डी आगाराला मिळालेल्या नवीन बसेस पळवण्याचा घाट !

### मनसे आणि प्रवासी संघटना आक्रमक अविनाश पालवे यांचा दोन्ही आमदारांसह प्रशासनाला जोरदार इशारा?

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी आगाराला नुकत्याच मिळालेल्या पाच नवीन राजमाता जिजाऊ बसेस परत मागवून त्यांच्याऐवजी निकृष्ट दर्जाच्या किंवा टाटा कंपनीच्या बसेस देण्याच्या प्रशासकीय हालचाली सुरू झाल्या आहेत या अन्यायकारक कारवाईविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आणि पाथर्डी तालुका प्रवासी संघटनेच्या वतीने आगार प्रमुखांच्या दालनात थेट आंदोलन करत प्रशासनाला तीव्र इशारा देण्यात आला आंदोलनादरम्यान मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी तांत्रिक मुद्द्यांवर बोट ठेवत प्रशासकीय भूमिकेवर जोरदार हल्लाबोल केला ते म्हणाले पाथर्डी आगारात यापूर्वीही टाटा कंपनीच्या गाड्या भरपूर प्रमाणात होत्या परंतु त्या सातत्याने मोठा मेंटेनन्स काढतात पाथर्डी तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था आणि डोंगराळ-घाटमाथा पाहता येथे टाटाच्या गाड्या टिकत नाहीत टाटाच्या गाड्यांना धावण्यासाठी सुसाट आणि गुळगुळीत रस्ते लागतात याउलट अशोक लेलँड कंपनीच्या बसेस अतिशय मजबूत टिकाऊ आणि कमी मेंटेनन्स लागणाऱ्या आहेत डोंगराळ भागात या गाड्या अत्यंत कार्यक्षमतेने धावतात पाथर्डी तालुक्याला



दोन-दोन आमदार असताना गाड्यांच्या श्रेयावरून चाललेल्या राजकीय आव्हानावर बोलताना अविनाश पालवे यांनी दोन्ही लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर थेट बोट ठेवले ते म्हणाले पाथर्डी आगारात नवीन बसेस दाखल झाल्या त्या दिवशी दोन्ही आमदारांच्या कार्यकर्त्यांनी गाड्या आम्हीच आणल्या असा दावा करत बस स्थानकावर मोठा गदारोळ केला आणि श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला बसेस पाथर्डीच्या बाहेर हलवल्या जात असताना दोन्ही आमदारांनी तातडीने हस्तक्षेप करून या जाणाऱ्या गाड्या थांबवून दाखवाव्यात तसेच नवीन बसेस आणल्याचा दावा करणारे आता बसेस रोखण्याचे कर्तव्य का पार पाडत नाहीत ? पाथर्डीचा घाटमाथा लक्षात घेता सध्या आलेल्या ५ लेलँड गाड्या पाथर्डीतच ठेवाव्यात आणि आगाराला तातडीने आणखी १० नवीन लालपरी बसेस द्याव्यात अशी ठाम मागणी शिष्टमंडळाने केली या आंदोलनाची आक्रमकता पाहून आगारप्रमुख अमित बनसोडे यांनी अहिल्यानगर विभागाचे विभागीय नियंत्रक जगताप यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली वरिष्ठ कार्यालयाशी संवाद साधून मनसे व प्रवासी संघटनेच्या मागण्यांनुसार सकारात्मक कारवाई करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले.

या आंदोलनात मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ संदीप काकडे गोरख जायभाय यांच्यासह मनसे पदाधिकारी व प्रवासी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास आंदोलनाची पुढील दिशा अधिक तीव्र असेल असा पुनरुच्चार मनसेने केला आहे.

## जालना हॉस्पिटल मध्ये तरुणीस अपमानास्पद वागणूक !

### सेवानिवृत्त जिल्हा शल्यचिकित्सक कारवाई करणार का

जालना । प्रतिनिधी

दिल्लीतील जंतर मंतर वरील आंदोलनाला अभूतपूर्व यश मिळाल्यानंतर संपुर्ण देशातील युवा पिढी सजग झाली आहे. जनतेच्या प्रश्नावर आवाज उठविण्याची आणि आपला आवाज बुलंद करण्याची संधी जेन झी सोडत नसल्याचे पाहायला मिळत आहेत. जालना शहरातील अंबड चौफुली इथे असलेल्या जालना हॉस्पिटल या खाजगी दवाखान्यात एका युवतीला जेनेरिक मेडिकल मधून औषधी आणली म्हणून अपमानास्पद वागणूक मिळाली. जेनेरिक औषधी खरेदी करणे हे आर्थिक दृष्ट्या फायद्याचे आहे. त्याचे परिणाम देखील इतर औषधांप्रमाणेच आहेत. मात्र, खाजगी दवाखाने नागरिकांना आपल्याच दवाखन्यातील मेडिकल स्टोर मधून मेडिकल खरेदी करण्यास भाग पाडत असल्याचा हा संतापजनक प्रकार घडल्यानंतर संबंधित तरुणीने इन्स्टाग्राम वर वीडियो बनवत झालेल्या अन्यायाकडे वाचा फोडली आहे.

वीडियो मध्ये केल्या जात असलेल्या दाव्यानुसार, संबंधित तरुणीची आई जालना हॉस्पिटल इथे उपचारांसाठी दाखल आहे. डॉक्टर प्रदीप हुसे हे नियमित तपासणीसाठी आले असत त्यांना जेनेरिक मेडिकल असल्याचे पाहिले. मेडिकल कुठून आणले असे डॉक्टरांनी विचारताच तरुणीने जेनेरिक स्टोर वरून आणल्याचे सांगितले. यानंतर, डॉक्टर हुसे यांनी साधे लोक आमच ऐकतात. तुम्ही चैट वाले स्वतःला जात शहाणे समजता. आमच्या सारख्या डॉक्टरांची तुम्हाला किंमत नाही असं म्हणाल्याचा दावा संबंधित तरुणीने वायरल झालेल्या वीडियो मध्ये केला आहे. या खाजगी दवाखान्यात डॉक्टरांच्या होत असलेल्या मनमानी चा मुद्दा पुन्हा एकदा ऐरण्? वर आला आहे. यामुळे खाजगी दवाखान्यात डॉक्टरांच्या होत असलेल्या मनमानी चा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आता महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाचे सेवानिवृत्त जिल्हा शल्यचिकित्सक राजेंद्र पाटील आणि जिल्हा आरोग्य अधिकारी या प्रकरणाचा दाखल घेऊन संबंधित डॉक्टर आणि हॉस्पिटल यांची चौकशी करणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## सेवारत सैनिक किशोर वाघमारे यांच्यावर कळमआंबा येथे शाही इतमामात अंतिम संस्कार

बीड.दि,२५ (जि. मा. का.) : देशाची सेवा करत असताना उपचारादरम्यान निधन झालेले सेवारत सैनिक गनर किशोर लक्ष्मण वाघमारे यांच्यावर त्यांच्या मूळ गावी कळमआंबा (ता. केज, जि. बीड) येथे शासकीय व शाही इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले.

कळमआंबा येथील रहिवासी असलेले सैनिक किशोर वाघमारे हे गेल्या ८ वर्षांपासून सैन्यदलात सेवेमध्ये कार्यरत होते. आजारावरील उपचारासाठी त्यांना कमांड हॉस्पिटल, पुणे येथे दाखल करण्यात आले होते. तेथे उपचार सुरू असताना २२ ऑगस्ट २०२६ रोजी अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले.त्यांनंतर २३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी त्यांच्या मूळ गावी कळमआंबा येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस दलातर्फे 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन मानवंदना देण्यात आली. तसेच प्रशासनाच्या वतीने केजचे तहसीलदार, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी आणि युसूफवडगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांनी पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे.

## पाणी सोडण्यासाठी उपसा सिंचन योजना मंजूर करा-सतीश घाटगे

### राजकारण बाजूला ठेवून एकत्र येण्याचे आवाहन

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड तालुक्यातील गल्हाटी प्रकल्पात जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून पाणी सोडण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, या मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्य राजू काकडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजपा नेते सतीश घाटगे यांनी भेट देऊन जाहीर पाठिंबा दिला. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून सुरू असलेल्या या न्याय्य मागणीसाठी आपण पूर्ण ताकतीने शेतकऱ्यांच्या सोबत असल्याचा विश्वास त्यांनी शेतकऱ्यांना दिला. तसेच गल्हाटी प्रकल्पात डाव्या कालव्याचे पाणी सोडण्यासाठी उपसा सिंचन योजना मंजूर करण्याची मागणी केली.**

यावेळी बोलताना सतीश घाटगे म्हणाले की, "दाढेगावसह परिसरातील दुष्काळ कायमचा हटविण्यासाठी डाव्या कालव्याचे पाणी गल्हाटी प्रकल्पात आलेच पाहिजे, ही भूमिका सुरुवातीपासून राहिली आहे. यासाठी जलसंधारण विभागाकडे पाठपुरावा करून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देखील प्राप्त झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रात उपसा सिंचन योजना राबवून अनेक कोरड्या प्रकल्पांना संजीवनी देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर जायकवाडीच्या डाव्या कालव्यावर उपसा सिंचन योजना मंजूर करून



गल्हाटी प्रकल्पात पाणी आणणे तांत्रिकदृष्ट्या पूर्णपणे शक्य आहे. असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी सर्वपक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्व लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांनी एकत्र येऊन हा लढा तीव्र व यशस्वी करावा, असे आव्हान त्यांनी केले. या आंदोलनात शेतकरी संघटनेचे सुरेश काळे, सामाजिक प्रतिष्ठानचे आर.व्ही. छल्लारे यांच्यासह परिसरातील स्थानिक पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# जिल्हा रुग्णालयाने माणसं मारण्याची सुपारी घेतली काय?

### ऑक्सिजन ह्युमिडिफायरमधील गढूळ पाण्याचा प्रकार;पालकमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना तक्रार

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयातील अनागोंदी कारभार संपण्याचे नाव घेत नसून, रुग्णांच्या उपचारातील हलगर्जीपणाच्या तक्रारींमुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. काही दिवसांपूर्वी वडवणी येथील संध्या सूरज पवार प्रसूतीसाठी बीड जिल्हा रुग्णालयात दाखल झाल्यानंतर सिझेरियन शस्त्रक्रियेदरम्यान वैद्यकीय साहित्य शरीरात राहिल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर संसर्ग झाल्याने आतडे तसेच गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करावी लागल्याचा आरोप असून, या प्रकरणामुळे जिल्ह्यात संतापाचे वातावरण आहे.दरम्यान, बीड जिल्हा रुग्णालयातील सेमी आयसीयू कक्षात उपचार घेत असलेल्या एका रुग्णाला सोनोग्राफीसाठी खाली आणण्यात येत असताना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्यामुळे रुग्णाला ऑक्सिजन मास्क लावून नेण्यात आले. मात्र, रुग्णाला ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या ह्युमिडिफायरमधील पाणी अत्यंत गढूळ असल्याचे निदर्शनास आले असा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर ह्युमिडिफायरमधील पाणी काढून टाकण्यात आले आणि रुग्णाला नवीन ह्युमिडिफायर लावून ऑक्सिजन पुरवठा सुरू करण्यात आला, अशी माहिती आहे.

ऑक्सिजन पुरवठा करताना काही परिस्थितींमध्ये ह्युमिडिफायरचा वापर ऑक्सिजनला आर्द्रता देण्यासाठी केला जातो. त्यामुळे नाक, घसा आणि श्वसनमार्गातील कोरडेपणा व जळजळ कमी करण्यास मदत होऊ शकते. ह्युमिडिफायरमध्ये वापरले जाणारे पाणी उपकरणाच्या उत्पादकाच्या सूचनांनुसार आणि रुग्णालयाच्या संसर्ग-नियंत्रण प्रोटोकॉलनुसार योग्य दर्जाचे व आवश्यकतेनुसार निर्जंतुक असणे महत्त्वाचे आहे. ह्युमिडिफायरमधील पाणी गढूळ, रंग बदललेले, दुर्गंधीयुक्त किंवा गाळयुक्त





आढळल्यास ते दूषित असण्याची शक्यता तपासणे आवश्यक आहे. अशा पाण्यात सूक्ष्मजीवांची वाढ झालेली असल्यास ह्युमिडिफायरच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या सूक्ष्म थेंबांमुळे श्वसनमार्गाच्या संसर्गाचा धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः आयसीयू, गंभीर आजारी किंवा प्रतिकारशक्ती कमी असलेल्या रुग्णांमध्ये संसर्गाचा धोका अधिक गंभीर ठरू शकतो. ह्युमिडिफायरची बाटली किंवा त्यातील पाणी योग्य पद्धतीने बदलले अथवा स्वच्छ केले नाही तर त्यामध्ये जैविक थर (बायोफिल्म) तयार होऊन सूक्ष्मजीवांची वाढ होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारची घटना घडल्यास रुग्णालयाच्या संसर्ग नियंत्रण समितीन तातडीने पाहणी करणे आवश्यक आहे. ह्युमिडिफायरमधील गढूळ पाण्याचा नमुना उपलब्ध असल्यास त्याची अधिकृत प्रयोगशाळेत सूक्ष्मजीवशास्त्रीय तपासणी करण्यात यावी. तसेच ह्युमिडिफायरची बाटली, ऑक्सिजन ट्यूबिंग, पाणी बदलण्याची प्रक्रिया, स्वच्छता व निर्जंतुकीकरणाची नोंद यांचीही तपासणी करण्यात यावी. रुग्णालयात अशा उपकरणांची नियमित तपासणी व संसर्ग नियंत्रणाची प्रक्रिया काटेकोरपणे राबवली जाते का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. बीड जिल्हा रुग्णालयातील वारंवार समोर येणाऱ्या तक्रारी आणि रुग्णांच्या उपचारातील कथित हलगर्जीपणाबाबत "बीड जिल्हा रुग्णालयाने माणसं मारण्याची सुपारी घेतली आहे काय?" असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून रुग्णालयातील ऑक्सिजन पुरवठा यंत्रणा, ह्युमिडिफायरमधील पाण्याची गुणवत्ता, स्वच्छता व निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया तपासावी. दोष आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे. याबाबत पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली असून, रुग्णांच्या जीविताशी संबंधित बाब असल्याने तातडीने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# बीड मतदारसंघातील मंडळ अधिकारी कार्यालयांच्या इमारतीसाठी निधी द्या

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची महसूल मंत्र्यांकडे मागणी; क्रीडांगणास जमीन देण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मंडळ अधिकारी कार्यालयांना स्वतंत्र व हक्काची इमारत नसल्यामुळे नागरिकांना महसुली कामकाजासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी बीड परिसरातील मंडळ अधिकारी कार्यालयांच्या नवीन इमारतींचे बांधकाम आणि दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजुरी, आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच, बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या क्रीडांगणास आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबई येथे मंगळवारी (दि.२५) राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन केली.





यावेळी डॉ.क्षीरसागर यांच्यासह भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, शुभम कातांगळे उपस्थित होते. निवेदनात पुढे म्हटले की, बीड तालुक्यातील अनेक महसूल मंडळ कार्यालयांचे कामकाज सध्या इतर तात्पुरत्या जागांमध्ये सुरू आहे. स्वतंत्र व सुसज्ज इमारतींअभावी शेतकरी, नागरिक आणि विद्यार्थ्यांना गैरसोयीला सामोरे जावे लागते. याशिवाय प्रशासकीय कामकाज करताना कर्मचाऱ्यांनाही मर्यादा येतात. त्यामुळे तालुक्यातील मंडळ कार्यालयांना हक्काच्या इमारती मिळणे गरजेचे असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन या सर्व कामांना तातडीने निधी व मंजुरी द्यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

### या मंडळांसाठी इमारतींची गरज

बीड, पाली, मांजरसुंबा, चौसाळा, लिंबागणेश, घाटसावळी, नाळवंडी, म्हाळसजवळा, चऱ्हाटा, राजुरी (न.), पारगाव सिरस, खालापुरी (ता. शिरूर का.) या मंडळ अधिकारी कार्यालयास नवीन इमारतींची आवश्यकता आहे. तसेच, रायमोहा (ता.शिरूर का.) येथील कार्यालयाची दुरूस्ती करण्याची अत्यंत गरज असून निधी मागणी करण्यात आली आहे.

### क्रीडांगणासाठी जमीन उपलब्ध करून द्या

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या क्रीडांगणासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या प्रदेश महामंत्रीपदी सलीम जहाँगीर

बीड । प्रतिनिधी

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीनजी, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात अखंड भारतवर्ष भारतीय जनता पक्षाची घोडदौड सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पशू संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात अल्पसंख्याक समूहाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी मजबूत संघटन बांधणी करण्यात आली आहे. पक्षाचे महाराष्ट्र अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेवरून अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष इद्रिस मुलतानी आणि प्रभारी राजेश पांडे यांनी अल्पसंख्याक मोर्चाची कार्यकारिणी जाहीर केली आहे. बीड येथील सलीम जहाँगीर यांच्यावर प्रदेश महामंत्री पदाची



जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

राज्याच्या पशू संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे आणि भाजप नेत्या माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांचे अतिशय विश्वासू म्हणून सलीम जहाँगीर यांची ओळख आहे. लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या विचारांतून पुढे आलेल्या सलीम जहाँगीर यांनी अल्पावधीत राज्य भाजपमध्ये नावलौकिक मिळवला. सर्व सामान्य भाजप कार्यकर्ता ते अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष, प्रदेश सचिव, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अशा विविध जबाबदाऱ्या सलीम जहाँगीर यांनी तितक्याच निष्ठेने सांभाळल्या. मुंडे साहेबांचा आणि त्यानंतर ताईसाहेबांचा सच्चा सैनिक म्हणून त्यांनी संघटन बांधणीत स्वतःला झोकून दिले. त्यामुळेच राज्यच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवरील पक्ष श्रेष्ठी देखील त्यांच्या कार्याची दखल घेतात.

◀◀ पान २ वर

# जाणीव प्रतिष्ठानच्या मोफत अन्नवाटपाच्या नावाखाली वर्गणी उकळणाऱ्यांपासून सावध राहा!

बीड । प्रतिनिधी : सिव्हिल हॉस्पिटल परिसरात गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून जाणीव प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी दररोज सायंकाळी ५ ते ६ वाजेच्या दरम्यान पुलाव राईस, खिचडी आदी खाद्यपदार्थांचे मोफत वाटप केले जाते. या सेवाभावी उपक्रमाचा कोणताही गैरफायदा घेऊ नये, असे आवाहन प्रतिष्ठानचे संस्थापक ड. विवेकानंद सानप यांनी केले आहे.

## संस्थापक ॲड.विवेकानंद सानप यांचे नागरिकांना आवाहन; संबंधित व्यक्तींना देणगी न देण्याचे आवाहन

जाणीव प्रतिष्ठानच्या नावाने काही व्यक्ती नागरिक, डॉक्टर तसेच इतरांकडे जाऊन आपण मोफत राईस, पुलाव अथवा खिचडी वाटप करीत असल्याचे सांगून वर्गणी अथवा देणगीच्या स्वरूपात पैसे मागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. संबंधित व्यक्तींचा जाणीव प्रतिष्ठानच्या या सेवाभावी उपक्रमाशी कोणताही संबंध नसल्याचे प्रतिष्ठानकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

हा संपूर्ण अन्नवाटपाचा उपक्रम ड. सानप व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने, कोणाकडूनही वर्गणी न घेता सातत्याने राबविला जात आहे. त्यामुळे जाणीव प्रतिष्ठानच्या नावाने कोणीही व्यक्ती पैसे किंवा वर्गणी मागत असल्यास नागरिकांनी त्याला बळी पडू नये आणि एक रुपयाचीही देणगी देऊ नये, असे आवाहन ॲड. सानप यांनी केले आहे. तसेच, जाणीव प्रतिष्ठानच्या नावाने अशा प्रकारे पैसे मागणारी

◀◀ पान २ वर

# जनगणनेचे काम पूर्ण; प्रगणक-पर्यवेक्षक मानधनाच्या प्रतीक्षेत!

## बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा कास्ट्राईबचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

जनगणना-२०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यातील कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांनी शासनाने निश्चित केलेल्या कालावधीत आपली जबाबदारी पूर्ण केली आहे.

जनगणनेसारख्या महत्त्वपूर्ण शासकीय कामासाठी नियुक्त झालेल्या या कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन सोपविण्यात आलेले काम जबाबदारीने व यशस्वीरीत्या पूर्ण केले;मात्र काम पूर्ण होऊनही त्याचा ठरलेला मोबदला अद्याप त्यांच्या बँक खात्यावर जमा झालेला नाही.

शासकीय कामासाठी वेळ,श्रम आणि जबाबदारी देऊन काम पूर्ण केल्यानंतरही मानधनासाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने प्रगणक व पर्यवेक्षकांमध्ये तीव्र नाराजी आहे.विशेषतःजनगणनेचे काम हे राष्ट्रीय तथा प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून,त्यामध्ये नियुक्त कर्मचाऱ्यांनी आपली नियमित जबाबदारी पूर्ण केली आहे.त्यामुळे शासनाने निश्चित केलेले मानधन विलंब न करता संबंधितांच्या खात्यावर जमा करणे आवश्यक असल्याची भावना कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधत महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, माजलगाव

◀◀ पान २ वर

# सुभेदार मेजर सतीश कुमार लादे सेवानिवृत्त

बीड । प्रतिनिधी

भारतीय सैन्यात सुभेदार मेजर या पदावर ३० वर्ष परिपूर्ण सेवा केल्यानंतर दि.३१जुलै २०२६ रोजी ते खडकी - पुणे येथून सेवानिवृत्त झाले आहेत. मूळ गेवराई तालुक्यातील मनुबाई जवळा येथिल ते रहिवासी आहेत त्यांचे वडिल व चुलते या पूर्वी भारतीय सैन्यात होते त्यांची प्रेरणा घेऊन ते भारतीय सैन्यात २७ मे १९९८ रोजी दाखल झाले.



नागालँड, कारगिल ,लेह, जम्मू अँड काश्मीर, सियाचीन ,राजस्थान,पूंछ, पतीयाला, पालमपूर आणि खडकी पुणे येथे त्यांनी देशासाठी सेवा बजावली आहे

राष्ट्राच्या सेवेच्या एका दीर्घ आणि समाधानकारक प्रवासानंतर, मी सुभेदार मेजर म्हणून भारतीय सैन्यातून अभिमानाने

◀◀ पान २ वर

# राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे पुजारी रामकिसन महाराज हजारे यांचे निधन

वडवणी । प्रतिनिधी

भारत देशातील राजा हरिश्चंद्राचे एकमेव तीर्थक्षेत्र असलेले बीड जिल्ह्यातील राजा हरिश्चंद्र पिंपरी येथील राजा हरिश्चंद्र मंदिराचे पुजारी श्री ह भ प रामकिसन महाराज हजारे यांचे सोमवारी रात्री निधन झाले. मंगळवारी दुपारी त्यांच्यावर राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर अंत्यविधी करण्यात आला. यावेळी वारकरी सांप्रदायिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

रामकिसन महाराज हजारे हे मागील जवळपास ६० ते ६५ वर्षांपासून हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे पुजारी



**राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर झाले अंत्यसंस्कार**

होते. विवाहित असले तरी त्यांना मूलबाळ नसल्यामुळे राजा हरिश्चंद्राच्या सेवेतच त्यांनी आपले आयुष्य खर्च केले. संत भगवान बाबा, संत भीमसेन बाबा यांचे पवित्र सानिध्य त्यांना लाभले होते. या दोन्ही संतांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे संगोपन केले. या ठिकाणी त्यांनी दरवर्षी होणाऱ्या महाशिवरात्र महोत्सवाचे वेळोवेळी सुंदर नियोजन केले. या भागातील प्रत्येक गावातील लहान लेकरांपासून ते वृद्धांपर्यंत ते परिचित होते आणि सर्वांसोबत त्यांचे अगदी जिव्हाळ्याचे संबंध होते. मुलबाळ नसल्यामुळे या भागातील सर्व लेकींना ते आपल्या मुलीसारखीच माया

◀◀ पान २ वर

# अंबाजोगाईत जबरी चोरी करणाऱ्या टोळीला एलसीबीकडून बेड्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी करणाऱ्या सराईत टोळीचा छडा लावून स्थानिक गुन्हे शाखेने दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि रोख रक्कम असा एकूण ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०९(४), ३(५) अन्वये दाखल असलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखा व अंबाजोगाई पोलीस समांतर तपास करत होते. तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन फिर्यादीकडून माहिती घेतली. अंबाजोगाई परिसरात



आरोपींचा शोध घेत असताना, गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार हा गुन्हा शिवम जनक कसबे (वय १९, रा. मोरेवाडी, अंबाजोगाई), योगेश हनुमंत शिंपले (वय १८, रा. कुंभेफळ, अंबाजोगाई) व त्यांच्या अन्य एका साथीदाराने केल्याचे निष्पन्न झाले.

मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे पथकाने सैनिक कॉलनी, मोरेवाडी येथील शिवम कसबे याच्या घरावर छापा टाकला. त्या ठिकाणी शिवम कसबे व योगेश शिंपले मिळून आले. पोलिसी खाक्या दाखवून चौकशी केली असता दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर प्लस मोटारसायकल व रोख रक्कम असा एकूण ८२,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपी व मुद्देमाल अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहेत. ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, अंमलदार मारोती कांबळे, सचिन सानप, रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे आणि चालक गणेश मराडे यांनी पार पाडली.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकाच्या सुशोभीकरणासाठी आ.धस यांच्याकडून निधी मंजूर!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकाच्या सुशोभीकरणासाठी आमदार सुरेश अण्णा धस यांनी निधी मंजूर करून दिल्याबद्दल पाटोदा शहरातील नागरिक, भीमसैनिक, अण्णाभाऊ साठे प्रेमी आणि सर्व सामाजिक बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून पाटोदा शहरातील नागरिकांकडून या दोन्ही महापुरुषांच्या चौकांचे सुशोभीकरण व्हावे, अशी सातत्याने मागणी केली जात होती. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हा केवळ एक चौक नसून समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेचा संदेश देणारे



प्रेरणास्थान आहे.

त्याचप्रमाणे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक हा श्रमिक, कष्टकरी, वंचित आणि सर्वसामान्यांच्या संघर्षाचे प्रतीक आहे. या दोन्ही महापुरुषांच्या विचारांना आणि कार्याला सन्मान देण्यासाठी चौकांचे सुशोभीकरण होणे ही काळाची गरज होती. या मागणीची गांभीर्याने दखल घेत आमदार सुरेश अण्णा धस यांनी निधी मंजूर करून दिला, ही निश्चितच पाटोदा शहरासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे.

या निधीमुळे दोन्ही चौकांचे आकर्षक व सुशोभित स्वरूपात विकासकाम होण्यास मदत होणार असून, पाटोदा शहराच्या सौंदर्यात निश्चितच भर पडणार आहे. तसेच या चौकांमधून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक नागरिकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि

◀◀ पान २ वर

# तहसीलच्या रस्ता अभियानाचा बट्ट्याबोळ, रस्ता आडवून वाटसरूंना मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील येवलवाडी येथील सरकारी रस्ता असतानाही या रस्त्यावर अतिक्रमण करून आणि खड्डे खोदून रस्त्याची पार वाट लावली आणि दादागिरीने हा रस्ता बंद करण्याचा प्रयत्न केला.

या रस्त्या संदर्भात महादेव आरसुळ यांनी रस्ता का बंद केला असा जाब विचारला असता त्यांच्या शेजारील लोक नवनाथ आसराजी येवले त्यांचा भाचा राम तांबे आणि मुलगा नटराज या तिघांनी महादेव आरसुळे यांच्यासह त्यांची वयोवृद्ध आई शांताबाई अरसुल आणि मूकबधिर पत्नी गंगासागर या तिघांनाही शिवीगाळ करून मारहाण केली आणि मोटरसायकल ही अडवून ठेवली यावरून शिरूर तालुक्यातील रस्ते अभियानाचा बट्ट्याबोळ झाल्याचे स्पष्ट होत आहे. यासंदर्भात तहसीलदारांनी सुनावनी ठेवली मात्र अद्याप यावर काही निर्णय झाला नाही.

येवलवाडी शिवारातून शेताकडे एक रस्ता जातो या रस्त्यावर काशीबाई बापू येवले, नामदेव आबा येवले, रमेश आबा येवले, जालिंदर गणपती येवले, यांच्या जमिनी आहेत. त्यांचा या रस्त्याला विरोध आहे. यासंदर्भात महादेव आरसुळ यांनी तहसीलदारांकडे रस्ता मोकळा करून द्यावा यासाठी तक्रार केली होती. या प्रकरणात १७ ऑगस्ट रोजी तहसीलदारांनी सुनावणी ठेवली. मात्र ही सुनावणी पुढे ढकलली. मंगळवारी दुपारी महादेव आरसुळ आणि त्यांची आई व पत्नी मोटरसायकल वरून जात असताना या रस्त्यावर नवनाथ येवले त्यांचा भाचा राम तांबे आणि त्यांचा मुलगा नटराज तांबे यांनी रस्ता अडवून महादेव आसराजी आरसुळ यांची गाडी हिसकावून घेतली आणि त्यांच्या आईला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. वास्तविक पाहता त्यांच्या आईचे वय ९५ वर्षे आहे. मात्र तरीही या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी आईला शिवीगाळ केली. याशिवाय त्यांची मूकबधिर पत्नी गंगासागर यांनाही अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली आणि त्यांची गाडी ताब्यात ठेवली. या प्रकरणी पोलीस चौकीला त्यांनी तक्रार केली मात्र पोलिसांनी ही तक्रार घेतली नाही. रस्ता असतांनाही अतिक्रमण करून हा रस्ता बंद करण्यात आला आहे. याची दखल तहसीलदार आणि संबंधित पोलीस ठाण्याने घ्यावी अशी मागणी नवनाथ महादेव हरसुल यांनी केली आहे.

# संध्या गायकवाड प्रकरणी न्याय मिळावा, वडवणीत रस्ता रोको

## आंबेडकरी समविचारी संघटनेचा पुढाकार, शासकीय नोकरीसह आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

संध्या गायकवाड प्रकाराची दाहकता बीड जिल्ह्यातील मंत्री, खासदार, आमदारांनी समजून घ्यावी तसेच या प्रकरणी लक्ष घालावे. अन्यथा कोणालाही रस्त्यावर समाज बांधव फिरू देणार नाहीत. याची दक्षता त्यांनी घ्यावी. असा इशारा बहुजन विकास मोर्चाचे संस्थापकीय अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी वडवणी येथील सर्वपक्षीय रास्ता रोको आंदोलनातून दिला आहे. आज वडवणी येथील छत्रपती - शिवाजी महाराज चौकात संध्या गायकवाडला न्याय मिळावा यासाठी दोन तास रस्ता रोको करण्यात आला.

वडवणी येथील लेक व सून संध्या गायकवाड (उजगरे) या १९ वर्षीय विवाहित महिलेच्या प्रसूतीच्या सिझर दरम्यान डॉक्टरांकडून अतिशय निष्काळजीपणा करण्यात आला आहे. या प्रकारामुळे जनमाणसातून अतिशय तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकाराविरोधी आज



वडवणीत आंबेडकरी समविचारी व सर्वपक्षीय, संघटनेच्या वतीने रस्ता रोकोचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य निषेध रॅली काढत रस्ता रोको करण्यात आला. हा रस्ता रोको बहुजन विकास मोर्चाचे संस्थापती अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला असून पोटभरे यांनी लोकप्रतिनिधीसह शासकीय रुग्णालयातील कारभाराविरोधात व आवाज उठवला लोकप्रतिनिधींनी देखील याबाबत

लक्ष घालून योग्य तो न्यायमिळावा. यासाठी आवाज उठवावा. अन्यथा समाज बांधव रस्त्यावर फिरू देणार नाहीत. असा इशारा देखील यावेळी त्यांनी दिला. यावेळी आंदोलनकर्त्यां कडून सिजरच्या वेळी उपस्थित असणारे डॉक्टर व कर्मचारी यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा, संध्या गायकवाड या महिलेला शासनाने शासकीय सेवेत रुजू करावे व ५० लाखाची आर्थिक मदत करावी, डॉक्टरांच्या दुष्काळजीपणाची चौकशी करून कठोर कारवाई करावी, संध्या गायकवाड यांच्या उपचाराची सर्व जबाबदारी शासनाने उचलावी, बीड येथील शासकीय रुग्णालयाने जाहीर माफी पान ७ वर

प्रशासनाला देण्यात आले. या रस्ता रोको मध्ये संध्या गायकवाड यांचे खुद्द आई शिला व बहील सुखदेव उजगरे यांच्य सह नगराध्यक्ष शेषराव जगताप,भाजपाचे युवा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, युवा नेते बाबरी मुंडे, सचिन सानप, राहुल घाड़गे, सतीश बडे, महादेव जमाले, संतोष डावकर, महादेव उजगरे, भास्कर उजगरे,

◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26